दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शनिवार दि.१५ नोव्हेंबर २०२५ | वर्षे४थे | अंक२९९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# बिहारमध्ये एनडीएचे उच्चांकी द्विशतक

## राजदसोबत काँग्रेसचेही पानिपत



◆ पाटणा (वृत्तसंस्था) :

बिहार निवडणुकीत भाजप-जदयूच्या आघाडीचा दणदणीत विजय झाला असून एनडीएला २०० हून अधिक जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रीय जनता दलाला मोठा झटका मिळाला असून काँग्रेसचेही पानिपत झाले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवत ९५ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. दुसरीकडे, महाआघाडीचा गड ढासळला असून तेजस्वी यादव मोठ्या अडचणीत आले आहेत. त्यांच्या पक्षाला अपेक्षित यश न मिळाल्याने महाआघाडी ६० जागांच्या आसपासच थांबताना दिसत आहे.

लालू प्रसाद यादव यांचे ज्येष्ठ पुत्र आणि माजी उपमुख्यमंत्री तेजप्रताप यादव यांचाही दणदणीत पराभव झाला आहे. काही महिन्यांपूर्वी लालू प्रसाद यादव यांनी तेजप्रताप यांना पक्ष व कुटुंबातून बेदखल केले होते. तेजप्रताप यादव यांना पक्षातून बाहेर काढल्यानंतर त्यांनी जनशक्ती जनता दल या पक्षाची स्थापना केली होती. ते स्वतः महुआ विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीला उभे राहिले होते.

निवडणुकांच्या निकालात भाजप एनडीएने मोठा विजय मिळवला असून भाजपच मोठा भाऊ ठरला आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत एनडीएमध्ये भाजप, जयदू, एलजेपी, एचएएम आणि आरएलएम या ५ पक्षांची एनडीए आघाडी होती. एनडीएमधील सर्वच पक्षांना गत २०२० च्या विधानसभा निवडणुकांच्या तुलनेत यंदा चांगले यश मिळाल्याचे दिसून येत आहे.

राज्यातील २४३ जागांपैकी यंदा भाजप आणि जदयूने १०२ जागांवर उमेदवार मैदानात उतरवले होते. तर, चिराग पासवान यांच्या लोकजनशक्तीने २९ उमेदवारांना तिकीट दिले. तसेच, हिंदुस्तानी आवाम मोर्चाने ६ आणि आरएलएमने ४ उमेदवारांना उमेदवारी दिली होती. त्यामध्ये, एनडीए आघाडीला २०० पेक्षा जास्त जागांवर विजय मिळत स्पष्ट झाले आहे. त्यामध्ये, भाजप ९१, तर नितीशकुमार यांच्या जदयूला ७९ जागांवर आघाडी असल्याचे रात्री उशिरा मतमोजणीदरम्यान दिसून आले. बिहार विधानसभा निवडणुकांध्ये एनडीए आणि महागठबंधन यांच्यात थेट लढत झाली. या निवडणुकीत एनडीए आघाडीला मोठे यश मिळाले आहे. त्यामुळे, भाजप आणि नितीशकुमार यांच्या जदयू पक्षाने विजयाचा जल्लोष सुरू केला आहे.

### जनतेचा सरकारवर विश्वास



बिहार विधानसभा निवडणुकीत आम्हाला प्रचंड बहुमत देऊन राज्यातील जनतेने आमच्या सरकारवर विश्वास व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मला दिलेल्या पाठिंब्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. या प्रचंड विजयाबद्दल आमचे सर्व एनडीए सहयोगी चिराग पासवान, जितन राम मांझी आणि उपेंद्र कुशवाह यांचे आभार. तुमच्या सहकार्याने बिहार आणखी प्रगती करेल आणि देशातील सर्वात विकसित राज्यांच्या श्रेणीत समाविष्ट होईल.

**- मुख्यमंत्री नितीशकुमार**, बिहार

### बिहारमध्ये सुशासन आणि विकासचा विजय

बिहारमध्ये सुशासन, विकास, जनकल्याण आणि सामाजिक न्यायाचा विजय झाला आहे. हा प्रचंड जनादेश आपल्याला लोकांची सेवा करण्यास आणि बिहारसाठी नवीन संकल्पाने काम करण्यास शक्ती देईल. एनडीएने राज्यात सर्वांगीण विकास घडवून आणला आहे. आमचा ट्रॅक रेकॉर्ड आणि काम बघून जनतेने आम्हाला प्रचंड बहुमत दिले आहे. पुढील काळात बिहारच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक वेगाने पावले उचलली जातील. राज्यातील पायाभूत सुविधा, उद्योग, संस्कृती तसेच युवावर्ग व महिलांच्या प्रगतीसाठी ठोस धोरणे राबवली जातील. बिहारला समृद्ध आणि सक्षम बनवण्याच्या दिशेने केंद्र-राज्य समन्वयाने कार्य करेल.

**- नरेंद्र मोदी**, पंतप्रधान



### घुसखोरांना पाठीशी घालणाऱ्यांना योग्य उत्तर

हा विकसित बिहारमध्ये विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक बिहारीचा विजय आहे. जंगलराज आणि तुष्टीकरणाचे राजकारण करणाऱ्यांना बिहारची जनता कुठल्याही परिस्थितीत संधी देणार नाही. या निकालातून व्होट बँकेसाठी घुसखोरांना पाठीशी घालणाऱ्यांना बिहारच्या जनतेने योग्य उत्तर दिले आहे. बिहारने देशाचा मूड स्पष्टपणे दाखवला. मतदार यादीचे शुद्धीकरण आवश्यक आहे आणि त्यास विरोध करणाऱ्या राजकारणाला जागा नाही. जनता आता केवळ परफॉर्मन्स आधारित राजकारणाला मत देते. ज्या विश्वासाने बिहारच्या जनतेने, विशेषतः माता-बहिणींनी एनडीएला बहुमत दिले, त्याहून अधिक समर्पणाने एनडीए त्याची पूर्तता करेल.

**- अमित शहा**, केंद्रीय गृहमंत्री



### काँग्रेसने त्यांचे दुकान बंद करावे

बिहारच्या निवडणुकीत भाजप व एनडीएला मिळालेल्या प्रचंड मोठ्या विजयाच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांचे प्रथमतः अभिनंदन! दोघांनीही सांगितल्याप्रमाणे जनतेने त्यांच्यावर मोठा विश्वास दाखवत प्रचंड बहुमत दिले आहे. बिहारमध्ये भाजपने दणदणीत विजय मिळवला आहे. आता काँग्रेसने दुकान बंद करावे. त्यांच्याकडे काहीच उरलेले नाही. आमचे विरोधक केवळ विरोधासाठी विरोध करत आहेत. आता तरी त्यांनी हे विरोधाचे राजकारण थांबवले पाहिजे. बिहारच्या निकालातून विरोधकांनी धडा घ्यावा. जनता विकासाला मतदान करत आहे, हे पुन्हा सिद्ध झाले आहे.

**- खासदार नारायण राणे**, रत्नागिरी - सिंधुदुर्ग



## फास्टटॅग नसलेल्या वाहनचालकांना आजपासून मोजावे लागणार दुप्पट पैसे

### यूपीआयद्वारे पेमेंट करणाऱ्यांना १.२५ पट जास्त रकमेचा दंड

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया (एनएचएआय) ने देशभरातील राष्ट्रीय महामार्ग आणि एक्सप्रेसवेवरील १,१५० टोल प्लाझावर 'फास्टटॅग वार्षिक पास' सुविधा नुकतीच सुरू केली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर सुरू झालेल्या या नवीन पासला खरेदीदारांकडून जबरदस्त प्रतिसाद मिळाला. केवळ एका दिवसात १.४ लाख लोकांनी हा पास खरेदी केला. या अभूतपूर्व प्रतिसादानंतर, एनएचएआयने एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. या घोषणेनुसार, १५ नोव्हेंबरपासून, ज्या वाहनांमध्ये फास्टटॅग नसेल आणि वाहन चालकांनी ऑनलाईन पेमेंट केले, तर त्यांना टोल शुल्काच्या केवळ १.२५ पट रक्कम आकारली जाईल.

ऑनलाईन कॅश पेमेंट पद्धतीमुळे विशेषतः नॉन-फास्टटॅग वापरकर्त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापैकी अनेक प्रवासी महामार्ग आणि एक्सप्रेसवेवरील टोल भरण्यासाठी यूपीआय किंवा इतर डिजिटल पेमेंट पद्धतींवर अवलंबून असतात. ज्यांच्याकडे वैध फास्टटॅग नाही, त्यांना रोखीने व्यवहार केल्यास मानक टोल रकमेच्या दुप्पट शुल्क भरावे लागते. १५ नोव्हेंबरपासून लागू होणाऱ्या सुधारित टोल रचनेमुळे नॉन-फास्टटॅग वापरकर्त्यांना यूपीआय वापरताना केवळ नियमित शुल्काच्या १.२५ पट रक्कम भरावी लागेल. यामुळे त्यांचा आर्थिक भार कमी होईल आणि देशात डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन मिळेल.

'नॅशनल हायवे फी नियम, २००८ मध्ये करण्यात आलेली ही सुधारणा, कार्यक्षम टोल वसुलीसाठी व टोल प्लाझावरील वाहतुकीची गर्दी कमी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा लाभ घेण्याच्या भारत सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

#### नवीन अधिसूचनेची आजपासून अंमलबजावणी

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने एक उदाहरण देऊन हे स्पष्ट केले आहे. जर एखाद्या वाहनाला वैध फास्टटॅगद्वारे १००/- इतके शुल्क भरावे लागत असेल, तर ते शुल्क रोखीने भरल्यास २००/- होईल आणि यूपीआयद्वारे भरल्यास ते १२५/- असेल. ही सुधारणा राष्ट्रीय महामार्ग वापरकर्त्यांसाठी प्रवासाची सुलभता वाढवणे, टोल वसुलीच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि शुल्क संकलन प्रक्रिया मजबूत करणे या उद्देशाने करण्यात आली आहे. ही नवीन अधिसूचना १५ नोव्हेंबर, २०२५ पासून अमलात येईल.

### ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल कालवश

**नवी दिल्ली :** हिंदी सिनेसृष्टीतील अभिनेत्री कामिनी कौशल यांचे वयाच्या ९८ वर्षी निधन झाले आहे. कामिनी कौशल यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९२७ रोजी झाला होता. त्यांनी १९४६ मध्ये 'नीचा नगर' या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. याच चित्रपटाने पहिल्या 'कान्स फिल्म फेस्टिव्हल'मध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार जिंकला होता. 'पाल्मे डी ओर' पुरस्कार जिंकणारा एकमेव भारतीय चित्रपट राहिला.



## कोरेगाव पार्क जमीन प्रकरणी ४२ कोटींच्या स्टॅम्प ड्युटीची नोटीस योग्यच !

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्पष्टीकरण

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

पुण्यातील कोरेगाव पार्क जमीन व्यवहार सरकारी मालमत्तेशी संबंधित असल्याने तो तांत्रिकदृष्ट्या रद्द करावा लागेल, मात्र हा व्यवहार रद्द करताना संबंधितांना एकूण ४२ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरावीच लागेल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

मंत्री बावनकुळे म्हणाले, मी कालच सांगितले होते की, हा विषय मी तपासणार आहे. तपासणी केल्यावर लक्षात आले की, नोंदणी आणि मुद्रांक विभागाने हा व्यवहार तपासून योग्य ती कारवाई केली आहे. व्यवहाराची मूळ रक्कम ३०० कोटी रुपये दाखवण्यात आली होती. त्यावर २१ कोटींची स्टॅम्प ड्युटी आकारण्यात आली.



आता हा व्यवहार रद्द करण्यासाठी रिकन्वेअन्स करताना त्याचप्रमाणे अजून २१ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी द्यावी लागेल. म्हणजेच एकूण ४२ कोटी रुपये भरावे लागतील, असे विभागाने स्पष्ट केले असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले, हा व्यवहार तांत्रिकदृष्ट्या चुकीचा झाला आहे. सरकारी जमीन परस्पर विकण्यात आली आहे. त्यामुळे तो खोटा व्यवहार ठरतो. सरकारकडे ती जमीन परत घ्यावी लागेल. मात्र, ज्या रकमेवर व्यवहार दाखवला आहे त्यावर मुद्रांक शुल्क आकारणे हे मुद्रांक अधिनियमातील नियमांप्रमाणे बंधनकारक आहे. कारण केंद्राच्या मुद्रांक कायद्यानुसार व्यवहाराच्या मूल्यावर आधारित शुल्क आकारले जाते. टायटलला यात अर्थ नाही; व्यवहार मुद्रांक अधिकाऱ्यांकडे जातो तेव्हा दाखवलेली रक्कम महत्त्वाची असते, असे नोंदणी व मुद्रांक महानिरीक्षकांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे महसूल विभागाने काढलेली नोटीस पूर्णतः नियमांनुसार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

आमची समिती या संपूर्ण कोरेगाव पार्क जमीन व्यवहाराचा अहवाल तयार करत आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल, असेही बावनकुळे यावेळी म्हणाले.

## उमर नबीचे घर सुरक्षा दलाकडून जमीनदोस्त

### कारवाईतून दहशतवादाविरोधी कठोर संदेश

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ सोमवारी (दि. १०) झालेल्या भीषण कार बॉम्बस्फोटातील मुख्य सूत्रधारावर सुरक्षा दलांनी गुरुवारी (दि. १३) रात्री कठोर कारवाई केली. हल्ल्यातील मास्टरमाईंड दहशतवादी उमर नबीचे घर आयईडी वापरून उडवण्यात आले. या कारवाईत त्याचे संपूर्ण घर जमीनदोस्त झाले आहे. ही कारवाई करून सुरक्षा दलाने दहशतवादाविरोधी कठोर संदेश दिला आहे.

दिल्ली आत्मघाती हल्ल्यात १३ नागरिकांचा मृत्यू झाला असून २० पेक्षा अधिक लोक जखमी झाले आहेत. हल्ल्यातील कारमध्ये अज्ञात व्यक्तीच्या मृतदेहाचे तुकडे आढळले होते, तर अनेक सीसीटीव्ही फुटेजमध्ये उमर कार चालवत असल्याचे दिसून आले. त्यामुळे कारमधील मृत अज्ञात व्यक्ती हा उमर असल्याचा संशय होता. त्यासाठी त्याच्या आईची डीएनए टेस्ट करण्यात आली. अखेर डीएनए टेस्ट १०० टक्के जुळली आणि उमरनेच हा हल्ला केल्याची खात्री झाली. त्यानंतर सुरक्षा दलाने त्याचे घर उडवून मोठी कारवाई केली आहे. या हल्ल्यात 'व्हाईट कॉलर टेरर मॉड्यूल' उघडकीस आले असून या कटात अनेक उच्चशिक्षित डॉक्टर सहभागी होते. आतापर्यंत मुजम्मिल अहमद, शाहीन शाहिद, आदिल या डॉक्टरांना अटक करण्यात आली आहे.



## खरडलेल्या शेतजमिनींसाठी मिळणार माती, गाळ, मुरूम, मोफत !

### जमिनीच्या सुपीकतेसाठी महसूलमंत्री बावनकुळे यांचा निर्णय

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

अतिवृष्टी व पुरामुळे खरडून गेलेल्या शेतजमिनीला पूर्वस्थितीत आणण्यासाठी लागणारी माती, गाळ, मुरूम, कंकर मोफत पुरवण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाने शुक्रवारी जारी केले.

शेतकऱ्यांना त्यांची जमीन पुन्हा लागवडीयोग्य व सुपीक करण्यासाठी लागणाऱ्या माती, गाळ, मुरूम, कंकर या गौण खनिजांवरील रॉयल्टी माफीच्या निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे सक्त आदेश बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

राज्याच्या अनेक भागांत अतिवृष्टी व पूरस्थिती निर्माण झाल्याने शेतपिकांचे नुकसान झाले. शिवाय, मनुष्य व पशुहानी यासह शेतजमीन खरडून जाणे, अतिरिक्त गाळ साठणे आणि जमिनीचा सुपीकस्तर वाहून जाण्याच्या घटना घडल्या.

> नैसर्गिक आपत्तीग्रस्त व्यक्तींना घर, गुरांचा गोठा, शेत व विहीर यांसाठी आवश्यक पाच ब्रास गौण खनिजाच्या वापरासाठी स्वामित्वधनातून सूट मिळेल. शेतकऱ्यांच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.
>
> **- चंद्रशेखर बावनकुळे**, महसूलमंत्री, महाराष्ट्र

## कामगार वसाहतीतील बिबट्या चार तासांनी जेरबंद

### आणखी एकाचा वनविभागाकडून शोध सुरू

◆ नाशिक (प्रतिनिधी) :

जिल्ह्यात उपद्रव माजवणाऱ्या बिबट्याने आता नाशिक शहरातही दहशत निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. शुक्रवारी दुपारी शहराच्या सातपूर परिसरातील कामगार वसाहतीत बिबट्याने केलेल्या हल्ल्यात वन अधिकाऱ्यांसह ३ नागरिक जखमी झाले असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नरभक्षक बिबट्याला जेरबंद करण्यात ४ तासाने यश आले. दरम्यान आणखी एक बिबट्या असून, त्याचा वन विभागाकडून तपास सुरू आहे.

गेल्या काही दिवसांपासून नाशिक जिल्ह्यात बिबट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. इगतपुरी, सिन्नर, दिंडोरी, नाशिक, निफाड आणि येवला या भागांत बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे आतापर्यंत दोन मुलांसह तीन जणांचा मृत्यू झाला आहे. शुक्रवारी दुपारी नाशिक शहरातील भोसला मिलिटरी कॉलेजच्या मागील कामगार वसाहतीत काम करणाऱ्या एका कामगारावर बिबट्याने अचानक हल्ला केला. या घटनेत तो कामगार जखमी झाला. माहिती मिळताच बिबट्या जवळील एका बंगल्यात पळून गेला. वन विभागाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्या बंगल्यात लपलेल्या बिबट्याच्या हल्ल्यात वनविभागाच्या अधिकाऱ्यांसह ३ नागरिक जखमी झाले आहेत. वनरक्षक संतोष बोडके, वनरक्षक प्रवीण गोलाईत आणि तीन स्थानिक रहिवासी या जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. येथील नागरिकांकडून या बिबट्याला तत्काळ जेरबंद करण्याची मागणी होत होती. जखमींना तत्काळ सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पुढील कारवाई व प्राथमिक उपचारासाठी बिबट्याला म्हसरूळ येथे हलवण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच जलसंपदा मंत्री गिरीश महाजन तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पाहणी करून जखमींची विचारपूस केली.





### सोन्याचा भाव

| | |
|---|---|
| २४ कॅरेट प्रति तोळा | १,२७,००० रुपये |
| २२ कॅरेट प्रति तोळा | १,१६,४५० रुपये |



### चांदीचा भाव

| | |
|---|---|
| प्रति किलो | १,७३,१०० रुपये |

शुक्रवारी अखेर सकारात्मक नकारात्मकतेवर भारी पडल्याने इक्विटी बेंचमार्क निर्देशांकात वाढ झाली आहे. भारतातील मजबूत फंडामेंटल, रेपो दरातील कपातीची आश्वासकता, जागतिक अनुकल आर्थिक परिस्थिती, स्मॉलकॅप सह वित्तीय शेअर्समध्ये झालेली वाढ या बहुढंगी कारणांमुळे बाजारात किरकोळ वाढ झाली.

### सचिन सोनवणेच योग्य,सर्व समाजाची एकमुखी मागणी

## संदीप भैय्यांकडून सचिन आप्पा सोनवणेच दावेदार?

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:नगर पालिकेची रणधुमाळी सुरु झाली असून बीड नगर पालिकेच्या नगराध्यक्ष पदा-चे अनेक इच्छुक उमेदवारांचे नावे समोर येत आहेत. सर्व पक्षाकडून इच्छुक नगराध्यक्ष आणि नगरसेवक उमेदवारांच्या मुलाख-ती घेण्यात आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) कडून देखील मुलाखती घेण्यात आल्या असून आ.संदीप क्षीरसा-गर यांच्याकडून सचिन आप्पा सोनवणे यांचे नगराध्यक्ष पदासाठी नाव जाहीर होऊ शक-ते.आ.संदीप क्षीरसागर यांनी दोन दिवस-ांपूर्वी राष्ट्रवादी भवन येथे सर्व समाजातील कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यांचे मते जाणून घेतली होती. त्यावेळी विशिष्ट समाजाकडून नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्याची मागणी होत असल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी सर्व कार्यकर्त्यांना जातीचे राजकारण केले जाणार नसल्याचे ठणकावून सांगितले होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाकडून बौद्ध समाजातील सचिन आप्पा सोनवणे यांना उमेदवारी मिळणार असल्या-चे बोलले जात आहे.नगराध्यक्ष पदासाठी दोन्ही राष्ट्रवादी सह भाजप आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या आघाडीमध्ये जोरदार लढत होणार असून विकासाच्या मुद्द्यावर होणार असल्याचे बोलले जात आहे. संदीप भैय्यांनी जर सचिन आप्पा सोनवणे यांना उमेदव-ारी दिली तर विजय पक्का अशी चर्चा बीड शहरात होताना पाहावयास मिळत आहे. सचिन सोनवणे हे देखील संदीप क्षीरसागर यांच्यासोबत एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहून काम करत आले आहेत. त्यांच्याकडे स्वच्छ प्रतिमेचा चेहरा आणि **पान सहा...**



बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांच्यावतीने बीड नगर परिषदच्या नगराध्यक्ष पदासाठी सचिन आप्पा सोनवणे यांचे नाव आघाडीवर असून सर्व समाजातून देखील त्यांना उमेदवारी मिळावी अशी मागणी होत आहे.

## पर्यावरणवादी पद्मश्री सालूमरदा थिमक्का यांचे निधन

### वयाच्या ११४ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

प्रसिद्ध पर्यावरणवादी, पद्मश्री पुरस्कार विजेत्या सालूमरदा थिमक्का यांचे शुक्रवारी वयाच्या ११४ व्या वर्षी निधन झाले. थिमक्का काही दिवसांपासून आजारी होत्या. बंगळूरुमधील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते, जिथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

३० जून १९११ रोजी तुमकूरू जिल्ह्यातील गुब्बी तालुक्यात त्यांचा जन्म झाला होता. ग्रामीण कर्नाटकात अनेक दशके केलेल्या वृक्षारोपणाच्या कार्यामुळे त्यांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली.



बंगळूरु दक्षिणमधील रामनगर जिल्ह्यातील हुलिकल आणि कुडूर दरम्यानच्या ४.५ किमीच्या पट्ट्यात त्यांनी ३८५ वडाची झाडे लावल्यामुळे त्यांना 'सालूमरदा' (झाडांची रांग) हे नाव मिळाले.

# बिबट्यांची दहशत

बिबट्यांच्या दहशतीने महाराष्ट्राचा अक्षरशः थरकाप उडाला आहे. ग्रामीण भागात संध्याकाळनंतर उघड्यावर वावरणं, रस्त्यातून चालत वा दुचाकीवरून जाणं किंवा शेतात काम करणं अशक्य झालं आहे. कालच बिबट्याने चारचाकीवरही हल्ला केला. बिबट्यांचा सर्वत्र सुळसुळाट झाला असून त्यांची पावलं आता ग्रामीण भागातून शहरातही पडू लागली आहेत. महाराष्ट्रातील ज्या शहरांचा विस्तार झाला आहे, त्या शहरांच्या कडेने जिथे अजूनही शेती केली जाते, अशा ठिकाणी राहणाऱ्यांच्या घरांच्या अंगणात बिबटे सर्रास आपल्या पंजांचे ठसे उमटवू लागले आहेत. कोकणात रानडुकरं, माकडं, तळकोकणात हत्तींनी उच्छाद मांडला आहे. मध्य महाराष्ट्रात मोरांनी शेतकऱ्यांच्या पेरण्याच गट्ट केल्याच्या तक्रारी आहेत. उत्तर, मध्य आणि दक्षिण महाराष्ट्रात बिबट्यांनी धुमाकूळ घातला आहे. बिबट्यांचा हा प्रश्न क्वचित मराठवाडा आणि विदर्भातही दिसतो. पण, सह्याद्रीच्या रांगेत त्याने जेवढं विक्राळ रूप धारण केलं आहे, तेवढं तिथे नाही. साधारण दहा वर्षांपासून पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांचा मुक्त वावर सुरू झाला. हरिश्चंद्रगडापासून कळसुबाईच्या पायथ्यापर्यंतच्या पट्ट्यात हा वापर सर्वात आधी जाणवू लागला. बिबट्यांनी शिवनेरीच्या पायाशी आपला रहिवास केल्यानंतर वन विभागाने जुन्नरला बिबट्यांसाठी तात्पुरती छावणी स्थापन केली. पुणे, अहिल्यानगर जिल्ह्यात पकडलेले बिबटे तिथे बंदिस्त केले गेले. त्यांच्यासाठी तिथे निकषानुसार पिंजरे, खानपान आदींची व्यवस्थाही केली गेली. तिथे 'बिबट सफारी' करण्यापासून अनेक योजना जाहीर केल्या गेल्या. बिबट्यांची व्यवस्था म्हणजे 'वाघ बचाव मोहिमे'चा भाग असल्यासारख्या अनेक रम्य कल्पना मांडल्या गेल्या. मानव आणि वन्यप्राण्यांच्या सहजीवनाबद्दल अनेक लेखही लिहिले गेले. हे लेखही मुख्यतः बिबट्यांची बाजू घेणारेच होते. पण, बिबट्यांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत गेल्याने बिबट्यांच्या बाजूने लिहिणाऱ्यांनी सध्या लेखण्या म्यान केलेल्या दिसतात. शेतकरी, ग्रामीण भागात राहणाऱ्यांचे हाल पाहिल्यानंतर आता कोणीच निसर्ग प्रबोधन करण्याच्या मनःस्थितीत नाही.

बिबट्यांच्या मानवी वस्तीतील वावराला माणूसच जबाबदार आहे, यात वाद नाही. पण, जे आज बिबट्यांचा त्रास सोसताहेत, ते त्याला जबाबदार नाहीत, हेही लक्षात घेतलं पाहिजे. चूक एकाची आणि शिक्षा भलत्यालाच असा हा प्रकार आहे. बिबट्यांची समस्या जटिल झाली आहे, ती मुख्यतः सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या पायथ्याशी. सह्याद्री सुस्थितीत राहिला, तरच महाराष्ट्राचं जीवन सुरक्षित राहील, असं तज्ज्ञ गेली ५० वर्षं सांगताहेत. सुमारे ४० वर्षांपूर्वी त्यासाठी 'पश्चिम घाट बचाव मोहीम'ही आखली गेली होती. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ माधव गाडगीळ यांचा सह्याद्रीच्या जैवविविधतेला संरक्षित करण्यासंबंधीचा अहवालही आपल्या हाती होता. पण, गाडगीळ हे 'पर्यावरण अतिरेकी' असल्याची टीका करून त्यांचा तो अहवाल आपल्याकडून सोयीने बाजूला सारला गेला. सह्याद्रीचं जंगल, वनसंपदा 'विकासकामां'साठी खुली केली गेली. सह्याद्रीच्या निबिड अरण्यात, मोठमोठी यंत्रसामग्री आवाज करू लागली. खोदकामांनी त्यांनी सह्याद्रीची कूस रिकामी केली. तिथलं प्राणी जीवन याने आधी अस्वस्थ आणि मग अस्ताव्यस्त झालं. बिबट्या हिंस्त्र असल्याने त्याची चर्चा होते. पण, हरणं, मुंगूस, मांजरांसारखे अनेक प्राणी आपला वनातला अधिवास सोडून नाईलाजाने डोंगर सोडून खाली आले. मानवी वस्तीत, गावालगतच्या शेतांत त्यांनी स्वतःसाठी आसरा निवडला. काही वर्षांपूर्वी झालेली माळीण किंवा इर्शाळवाडीची दुर्घटना अशाच कारणांनी झाल्या होत्या. वाढती लोकसंख्या, शहरी जीवनापासून दूर जाऊन जंगलात 'फार्म हाऊस' करण्याची हौस, रिसॉर्ट, वॉटर पार्क यांसारख्या वेगवेगळ्या कारणाने महाराष्ट्रात मुळात वनजमिनींचं अधिग्रहण वाढलं आहे. सरकारी विभाग आपल्या विकासकामांसाठी वन जमिनीची मागणी करतात. ते त्या बदल्यात झाडं लावण्याचं कागदोपत्री मान्यही करतात. पण, प्रत्यक्षात अशी यशस्वी वृक्ष लागवड कुठेच होत नाही. नवे रस्ते बांधताना किंवा अस्तित्वात असलेल्या रस्त्यांच्या रुंदीकरणात झाडांची जेवढी कत्तल होते, त्यांचं ना पुनर्रोपण होत, ना कोणी नवी झाडं लावतं!

महाराष्ट्राच्या वनसंपत्तीचं झालेलं उद्ध्वस्तीकरण आपल्याला बिबट्यांच्या मानवी वस्तीतील वावरातून दिसतं आहे. दुर्दैवाने हे ना कोणी सांगतं आहे, ना कोणी कबूल करतं आहे. बिबट्यांच्या बंदोबस्तासाठी अनेक उपाय आहेत. त्यातल्या कोणत्या ना कोणत्या उपायांनी मानवी वस्तीतले बिबटे नष्ट करता येतील! पण त्यामागे जी वन्य जीवसाखळी आहे; ती उद्ध्वस्त होते आहे, त्याचं काय? हा निसर्गवादी दृष्टिकोन नाही. माणसाच्या जगण्याचं इंगितच या निसर्गात आहे. सिमेंटीकरणाच्या हव्यासापोटी, किरकोळ हितसंबंधांसाठी आपण हजारो वर्षांची जीव साखळी उद्ध्वस्त करतो आहोत, म्हणजे दूरवर माणसाचा श्वासच तोडतो आहोत, ही जाणीवच कुठे दिसत नाही. डोंगरदऱ्यातून बाहेर पडलेल्या बिबट्यांना पुणे – अहिल्यानगर – नाशिक पट्ट्यातील उसाच्या शेतांत आसरा घेणं सोपं होतं. बिबट्यांची बाळंतपणंही या उसात झाली आणि त्यामुळे त्यांची संख्याही भरमसाट वाढली. 'एआय'चा वापर करून मांजराला घाबरून बिबट्या पळाला किंवा माणसाने शौर्याने त्याचा मुकाबला केल्याच्या नकली 'रील' तयार करणं सोपं आहे. एखाद् दुसऱ्या ठिकाणी असं घडलंही असेल. पण, अपवाद म्हणजे नियम नाही. महाराष्ट्राचा ग्रामीण भाग सध्या केवळ भयभीतच नाही, मुलाबाळांच्या काळजीने अस्वस्थ आहे. सरकारने याची गंभीर दखल घेऊन तातडीची उपाययोजना म्हणून बिबट्यांच्या नसबंदीची धडक मोहीम राबवण्याचे आदेश वनविभागाला दिले पाहिजेत. दुसऱ्या बाजूला वनसंपदेचा गंभीर विचार करून त्यासंबंधीचं स्वतंत्र नवं धोरण जाहीर केलं पाहिजे. महाराष्ट्राच्या समृद्धीची वाट वनसंपदेच्या समृद्धतेतूनच आहे, याची जाणीव त्या धोरणात दिसली पाहिजे. त्यातून संरक्षणही होईल आणि अनेक समस्याही सुटतील.

# मराठवाड्यात हुडहुडी वाढली...!

**छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, बीड, धाराशिव या जिल्ह्यांत थंडीचे प्रमाण वाढले आहे. उत्तर भारतात बर्फवृष्टी झाल्यानंतर त्याचे परिणाम महाराष्ट्रात दिसू लागतात. त्याचप्रमाणे मराठवाड्यातदेखील चांगलीच हुडहुडी भरली आहे. बहुतांश ठिकाणी आता हवेत चांगलाच गारठा जाणवू लागला आहे.**



राज्यात पावसाने विश्रांती घेतल्यानंतर थंडीचे जोरदार आगमन झाले आहे. राज्यात अनेक ठिकाणी हुडहुडी वाढली आहे. उत्तरेकडील शीत वाऱ्यांमुळे उत्तर महाराष्ट्रात थंडीची लाट कायम आहे. राज्याच्या किमान तापमानात २ ते ८ अंशांची मोठी घट झाल्याने हुडहुडी वाढली आहे. राज्यातील हवामान मुख्यतः कोरडे राहणार आहे. उत्तरेकडे थंडी कायम राहण्याची तर दक्षिणेकडे किमान तापमानात काही अंशी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. मराठवाडा व विदर्भात तापमानात चांगलीच घट झाली आहे. मराठवाडा व विदर्भाची सीमा एकमेकांच्या लगत आहेत. यंदा विदर्भाच्या तुलनेत मराठवाड्यात जास्त थंडी जाणवत आहे. या पाठोपाठ पश्चिम महाराष्ट्रात थंडी सौम्य आहे. कोकणाच्या तुलनेने यंदा पश्चिम महाराष्ट्रातील थंडी कमी जाणवत आहे, असे त्या भागात राहणाऱ्या मराठवाड्यातील नागरिकांच्या प्रतिक्रिया आहेत. या आठवड्यात पुणे, मुंबई, नाशिक, सातारा या भागात किमान तापमान १२ ते १६ अंश सेल्सीएसच्या दरम्यान नोंदविण्यात आले. हवामान विभागाने देखील मराठवाड्यातील काही जिल्ह्याच्या बाबतीत अलर्ट जाहीर केला आहे. मराठवाड्यात आठ जिल्हे आहेत. त्यापैकी परभणी जिल्ह्यात नेहमीच उष्णता व थंडीचे प्रमाणही जास्त असते. राज्यात तापमानात घसरण झाल्याने महाबळेश्वरसारखी थंडी जळगावमध्ये अनुभवास येत आहे. मागच्या वर्षी हिवाळा ऋतूत सुरुवातीलाच मराठवाड्यातील परभणी येथे पारा चांगलाच घसरला होता; परंतु सध्या जळगावचे तापमान १० अंश सेल्सीएसवर आले आहे. उत्तर भारतात गारठा वाढल्याने त्याचा परिणाम मराठवाड्यात चांगलाच दिसून येत आहे. आता येत्या काही दिवसांत मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत अशाच प्रकारे थंडी वाढणार आहे. उत्तर भारतात बर्फवृष्टी होत असल्याने महाराष्ट्रातील हवामान बदलण्यास सुरुवात झाली आहे. मुंबई तसेच कोकणात दरवर्षीपेक्षा कमी थंडी राहण्याचा अंदाज हवामान खात्यातर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

सातारा, महाबळेश्वर या भागात १६ अंश सेल्सीएसपेक्षा कमी तापमानाची नोंद करण्यात आली. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी या तीन जिल्ह्यांत किमान तापमानाची नोंद करण्यात आली. याबरोबरच नांदेड, हिंगोली, धाराशिव, बीड, लातूर या ठिकाणीही थंडीचा जोर वाढला आहे. मराठवाड्यात १३ अंश सेल्सीएसपर्यंत तापमानाची नोंद करण्यात आली. नाशिकचा पारा १२ अंश सेल्सीएसवर आला आहे. पुण्यात नेहमीच थंडगार वातावरण असते. त्या ठिकाणी तापमानाची नोंद १६ अंश सेल्सीएस एवढी नोंदविण्यात आली. असाच काहीसा अनुभव मराठवाड्यात जाणवत आहे. उत्तर भारतातील हवामान जोपर्यंत स्थिर होणार नाही, तोपर्यंत मराठवाड्यातील वातावरणात असाच गारवा राहील, असे हवामान खात्यातर्फे कळविण्यात आले आहे. मराठवाड्यातील वातावरणात बदल दिसून आल्यानंतर सर्दी, ताप, खोकला हे आजार दिसून येत आहेत. लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांना सर्दी व खोकल्याचा आजार झाल्याचे दिसून येत आहे. मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात ग्रामीण भागातही थंडीचा जोर वाढल्याने शेकोट्या पेटविल्या जात आहेत. मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यातील शेतात असलेले पीक काढण्यात आल्यानंतर शेतकरी थोडासा निवांत झाला आहे. यंदा मराठवाड्यात सर्वत्रच अतिवृष्टी झाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या हातातील पिके वाया गेली. यंदा पावसाळा मोठा होता. त्यामुळे थंडी देखील जास्त राहील असा अंदाज मराठवाड्यातील वयोवृद्ध व जाणकार लोकांकडून काढण्यात आला होता. मराठवाड्यातील ग्रामीण भागात ऋतुचक्र बदलले असल्याने शेतात पीक घेत असताना शेतकऱ्यांची दमछाक होत आहे. मराठवाड्यात आता तर थंडीचा जोर वाढल्याने अशा रब्बीच्या वातावरणात कुठली पिके घ्यावीत, याबाबत शेतकरी देखील मार्गदर्शन घेत आहेत. उत्तर भारतातील वातावरणावर मराठवाड्यात होत असलेल्या वातावरणातील बदल लक्षात घेतला जातो. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका होणार आहेत. ऐन थंडी काळात निवडणुका होणार असल्याने या वातावरणाचा प्रचार, सभा, निवडणूक, मतदान, मतमोजणी यावर नक्कीच परिणाम होणार आहे. एकीकडे वातावरणातील गारवा व दुसरीकडे राजकारणातील गर्मी असे चित्र काही दिवसांत मराठवाड्यातील ग्रामीण भागात पाहावयास मिळणार आहे.



वार्तापत्र
मराठवाडा

दरम्यान हुडहुडी वाढल्याने आरोग्यविषयक प्रश्न देखील निर्माण होत आहेत. थंडीच्या काळात ज्येष्ठ नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. थंडीच्या या काळात हातमोजे, स्वेटर, मफलर, कानपट्टीचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. अनेकांनी कपाटात बंद केलेले हे सर्व साहित्य बाहेर काढले आहे. यंदा थंडी दरवर्षीपेक्षा जास्तच राहणार आहे. त्यामुळे थंडीच्या लाटा लक्षात घेऊन घराबाहेर पडताना काळजी घ्यावी, असे आरोग्य विभागातर्फे सांगण्यात आले आहे. सकाळी दररोज पायपीट करणारी मंडळी देखील थंडीमुळे उशिरा घराबाहेर पडत आहेत. एकंदरित ही थंडी वाढतच जाणार असल्याने सकाळी १५ अंश सेल्सीएसपेक्षा जास्त तापमान झाल्यानंतरच घराबाहेर पडणे आरोग्याच्या दृष्टीने योग्य राहील, असा सल्ला डॉक्टर मंडळींकडून दिला जात आहे. शेवटी प्रत्येकाच्या आरोग्यावर थंडीचा वेगवेगळा परिणाम होत असतो. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला तसेच शरीराला मानवणारी थंडी याचा विचार करूनच प्रत्येकाने घराबाहेर पडावे, असेही आरोग्य विभागाच्यावतीने सांगण्यात येत आहे. दरम्यान मराठवाड्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत किमान उष्णतेचा पारा नसल्याचा फायदा प्रचारासाठी नक्कीच होणार आहे. पावसाळा व अति उष्ण उन्हाळा या दोन ऋतूत प्रचार करणे थोडेसे किचकट असते; परंतु या दोन ऋतू व्यतिरिक्त हिवाळ्यामध्ये मात्र उमेदवारांना प्रचारात तेवढी अडचण येत नाही. यामुळे यंदाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रंगतदार तसेच उमेदवारांना विकासासाठी उष्णता देणारे ठरो, असेच यानिमित्ताने म्हणता येईल.

**- डॉ. अभयकुमार दांडगे**

# रेल्वे परिसरातील अनाथ मुलांसाठी आरपीएफचे 'सुरक्षा कवच'

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी, १४ नोव्हेंबर हा दिवस भारतात बालदिन म्हणून साजरा केला जातो. पंडित नेहरू हे असे नेते होते ज्यांनी मुलांवर खूप प्रेम केले. मुलं ही भारताचे उज्ज्वल भविष्य असल्याचे त्यांचे ठाम मत होते. म्हणून या मुलांचे पालन-पोषण, त्यांच्यावर होणारे संस्कार यावर त्यांचा अधिक विश्वास असे. बालदिन म्हटलं की, देशातील, प्रत्येक राज्यातील शाळांमध्ये हा दिवस चिमुकल्यांबरोबर साजरा केला जातो. प्रत्येक बालकाच्या चेहऱ्यावरील हास्य आणि त्या हास्यातली ती चमक बरंच काही सांगते. अनके उद्याने या बालकांसाठी विविध रंगांनी भरलेली असतात. या वातावरणात या मुलांच्या बालपणाचा उत्साह साजरा करण्यासाठी प्रत्येकजण एकत्र येतात; परंतु या उत्सवांमध्येही एक शांत, जागरूक शक्ती अस्तित्वात आहे जी भारतीय रेल्वेवरील मुलांच्या निरागसतेचे रक्षण करण्यासाठी चोवीस तास काम करते. केवळ मुलांना फुगे किंवा मिठाई देऊन या मुलांचे मनोधैर्य वाढवत नाही तर यांचे संरक्षण करण्यास ते नेहमी तत्पर असतात, ते आहे (आरपीएफ) रेल्वे संरक्षण दल, जे केवळ प्रवाशांचे आणि रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्यापेक्षा या मुलांचे संरक्षण त्यांना आसरा देणारे महत्वाचे नायक ठरले आहे.

**'आजची मुले उद्याचा भारत घडवतील': पंडित जवाहरलाल नेहरू**

रेल्वेच्या परिसरात वावरणारी ही अनेक पोरकी मुले आहेत. आरपीएफ या मुलांसह त्यांच्या स्वप्नांचे रक्षण करतात. रेल्वे प्लॅटफॉर्मच्या कोपऱ्यात, पायऱ्यांखाली, वेटिंग रूममध्ये आणि चालत्या गाड्यांमध्ये, हजारो मुलांना या उत्सवाची माहितीही नसते. अनेकदा ही मुले तस्करीचे बळी ठरतात. कोणीतरी अत्याचार करतोय म्हणून त्यापासून सुटका करून घेण्यासाठी तिथून पळून जाणारी मुले दुसऱ्या सापळ्यात अडकतात. स्वतःच्या पोटच्या मुलाला रेल्वे परिसरात सोडून दिलेली, हरवलेली किंवा बालमजुरीसाठी भाग पाडलेली मुले असतात ही. त्यांची निरागसताच हरवलेली असते. अशा मुलांच्या चेहऱ्यावर एक निरागस हास्य, जगण्याची ऊर्मी, एक आशा, उमेद देणारा हा बालदिन यांच्यासाठी खूप काही देणारा असतो. कोणाच्या तरी मायेची ऊब शोधणारी ही मुले यांच्यासाठी बालदिन हा उत्सव नाही, तर मदतीसाठी दिलेली हाक आहे. या आवाहनाला साथ देणारे, ही हाक ऐकणारे रेल्वे संरक्षण दलाचे (आरपीएफ) खाकी पोशाखातील पुरुष आणि महिला आहेत.



'आरपीएफ' जिथे कर्तव्य आणि प्रेम यांचा संगम होतो. रेल्वे सुरक्षासाठी आरपीएफची ओळख आहे; परंतु अनेकांना आरपीएफ बाल संरक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण योगदान असल्याची माहिती नसते. अनेकदा येथील गर्दी आणि गोंधळ असलेली रेल्वे स्थानके मुलांसाठी धोकादायक क्षेत्र असतात. जिथे ते त्यांच्या कुटुंबांपासून दूर होऊ शकतात, तस्करांना बळी पडू शकतात किंवा स्वतःला संकटात टाकू शकतात. अशावेळी आरपीएफ कर्मचारी केवळ कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी पुढे येत नाहीत, तर या मुलांचे पालक, मार्गदर्शक आणि काळजीवाहक म्हणून देखील त्यांच्या पाठीशी उभे राहतात. १९५७ मध्ये स्थापन झालेले, आरपीएफ मूळतः रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्याचे काम सोपवण्यात आले होते. त्यानंतर प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली; परंतु गेल्या काही वर्षांत, देशातील रेल्वे परिसरातून प्रवास करणाऱ्या हजारो संकटग्रस्त मुलांसाठी सुरक्षा कवच ठरले आहे. या मुलांसाठी केवळ रेल्वेच सुरक्षा कवच का ठरते, तर याचे कारण कारण तस्कर, बालकामगार दलाल आणि अपहरणकर्ते अधिकाधिका रेल्वेलाच प्राधान्य देतात. ६७,००० किलोमीटरहून अधिक ट्रॅक, १२,००० हून अधिक गाड्या आणि ७,००० स्थानकांसह, भारतीय रेल्वे वाहतुकीचा एक चमत्कारिक प्रवास आहे आणि दुर्दैवाने, मुलांसाठी असुरक्षित कॉरिडॉर आहेत, येथेच आरपीएफ बाल तस्करी, बालकामगार आणि रेल्वेवरील शोषणाविरुद्ध भारताच्या पहिल्या संरक्षण रांगेत काम करते.

२०१७ मध्ये, भारतीय रेल्वेने आरपीएफ अंतर्गत ऑपरेशन नन्हे फरिश्ते नावाचा एक परिवर्तनकारी उपक्रम सुरू केला, ज्याचा शब्दशः अर्थ "छोटा फरिश्ता" असा होतो. त्याचे उद्दिष्ट रेल्वे परिसरात संकटात सापडलेल्या मुलांची सुटका करणे, पुनर्वसन करणे आणि त्यांचे संरक्षण करणे आहे. त्याच्या स्थापनेपासून, ऑपरेशन नन्हे फरिश्तेने १.६ लाखांहून अधिक मुलांची सुटका केली आहे, ज्यात हजारो मुलांचा समावेश आहे, ज्यांना मजुरी किंवा अत्याचारासाठी तस्करी करण्यात आली होती. पुनर्वसनासाठी त्यांनी चाइल्डलाइन (१०९८), जिल्हा बाल संरक्षण युनिट्स आणि स्वयंसेवी संस्थांशी भागीदारी केली आहे. प्रमुख स्थानकांवर बाल मदत केंद्रे स्थापन केली आहेत. प्रमुख स्थानकांवर, बाल मदत केंद्रे असुरक्षित मुलांसाठी आश्रयस्थान बनले आहे. रेल्वे संरक्षण दल (RPF), पोलीस, १०९८ आणि स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने चालवली जाणारी ही सेवा तत्काळ निवारा, अन्न आणि वैद्यकीय सेवा, बाल संरक्षण प्रणालींशी नोंदणी, बाल कल्याण समित्यांशी संबंध आणि कायदेशीर मदत आणि हरवलेल्या मुलांच्या तक्रारींचा मागोवा घेण्यास पुढे येते. सुटका केलेल्या मुलांना फक्त त्यांच्या ताब्यात दिले जात नाही, त्यांची काळजी घेतली जाते, त्यांना सांत्वन केले जाते. हजारो आरपीएफ कर्मचाऱ्यांना अशा मुलांना कशाप्रकारे समजून घ्यायचे याचे प्रशिक्षण दिले जाते; परंतु प्रत्येकात एक संवेदनशील हुशार कर्मचारी दडलेला आहे. भारतात ४७२ दशलक्षहून अधिक मुले राहतात. त्यापैकी आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या असुरक्षित कुटुंबांमधून येतात. वेश्याव्यवसायात विकले जाण्यासह लैंगिक शोषण, जबरदस्तीने भीक मागणे या सगळ्या प्रकाराला आळा घालण्यासाठी रेल्वे नेटवर्क एक योग्य दिशा ठरते. आरपीएफ अशा अनेक पीडितांच्या केवळ रक्षकच नाहीत तर बहीण, माता आणि सल्लागार देखील आहेत. आजही, हजारो मुले अनधिकृतरीत्या मजूर म्हणून राबतात. 'कामगार'या शब्दाचा अर्थही न समजण्याच्या वयात त्यांचे भवितव्य यात गुरफटले जाते. आरपीएफने या हजारो मुलांची सुटका केली. त्यांच्या भूमिकेचे महत्त्व ओळखून, रेल्वे मंत्रालयाने आरपीएफ कर्मचाऱ्यांसाठी विशेष बाल संरक्षण प्रशिक्षण, विशेषतः संवेदनशील भागात अधिक महिला कॉन्स्टेबलची भरती, सीसीटीव्ही, फलक आणि जागरूकता मोहिमांसह स्टेशन पायाभूत सुविधा मजबूत करणे आणि जिल्हा बाल कल्याण अधिकारी आणि बाल न्याय मंडळांशी चांगले समन्वय यामध्ये गुंतवणूक केली आहे. भारतीय रेल्वे केवळ वाहतूक नेटवर्क नसून प्रत्येक मुलासाठी एक सुरक्षित कॉरिडॉर आहे.

**- ए. इब्राहिम शेरीफ**
**आयआरपीएफएस, डीआयजी-कम-सीएससी, आरपीएफ/दक्षिण रेल्वे**

## जनसंवाद

### पाकिस्तान नष्ट करा

राजधानी दिल्ली येथील लाल किल्ला येथे झालेल्या रासायनिक बॉम्बस्फोटानंतर पकडण्यात आलेले डॉ. अहमद राठर, डॉ. आदिल, डॉ. अहमद सय्यद, डॉ. शाहिन शाहिद, डॉ. मुजाम्मिक शकील हे जैश-ए-महंमद या आतंकवादी संघटनेची संबंधित होते. या सर्वांकडून अमोनियम नायट्रेट शस्त्रास्त्र आणि स्फोटके देखील जप्त करण्यात आली. डॉक्टर मुजाम्मिकच्या घरातील शस्त्रसाठ्यात चिनी पिस्तूल मिळाले. आतंकवाद्यांना चीनसह अन्य देशांचे सहाय्य मिळत असल्याचा हा एक पुरावा आहे. ऑपरेशन सिंदूरने जैश एमहंमदला लक्ष केले. त्याचा हा सूड होता. खरे तर दिवाळी व २६ जानेवारीला संपूर्ण देशात बॉम्बस्फोट घडवण्याचा त्यांचा मानस होता पण नियतीच्या मनात वेगळेच होते. हे सर्व डॉक्टर समाजसेवेच्या नावाखाली शस्त्र पुरवठा, निधी पुरवठा आणि जिहादी विचारसरणी पसरविणे हे काम करत होते. तज्ज्ञ पोलीस आणि लष्करी अधिकारी यांच्या मते शासकीय यंत्रणा ९०% घटनांमध्ये घटना होण्यापूर्वी त्यांचे डाव उद्ध्वस्त करत आहे. हे आपल्या गुप्तचर यंत्रणेसह विविध यंत्रणांचे यश आहे. वारंवार आक्रमणे करणाऱ्या आतंकवाद्यांचा प्राण असलेल्या पाकिस्तानला नष्ट करण्याचे ध्येय आता सरकारने ठरवले पाहिजे.

**- लीना मकरंद गाडगीळ,** पनवेल

### गुगल पेचा विश्वास दुणावला

माझे अनेक वर्षांपासून आर्थिक व्यवहार आहेत त्या माझ्या राष्ट्रीयीकृत बँकेतून २ ऑक्टोबर २०२५ रोजी एका व्यक्तीला गुगल पे वरून रुपये ६२५०/- पाठवले होते पण त्या व्यक्तीला ती रक्कम मिळाली नव्हती. कारण ज्या व्यक्तीला रक्कम पाठवली त्या बँकेचा आयएफसी कोड बदलेला होता. वास्तविक पाहता ते ट्रांजेक्शन फेल व्हायला पाहिजे होते पण ते न होता डेबिट झाले होते. त्यामुळे ज्या राष्ट्रीयीकृत बँकेतून रक्कम पाठवली तेथे छानबिन, चौकशी केली असता ती रक्कम खर्चल्याचे समोर आले. ऑनलाईन व्यवहाराच्या दृष्टीने किमान तीन ते सात दिवसांत ती रक्कम रिफंड व्हायला पाहिजे होती पण तसे झाले नाही. नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचा मेल प्राप्त झाला. थोडा धीर आला होता. तब्बल ४० दिवसांनी गुगलपेने रक्कम जमा केली. त्यामुळे गुगल पे वरील विश्वास अधिक दुणावला.

**- राजू जाधव,** मांगूर जि. बेळगांव

### सावित्रीबाई नाट्यगृहाचे पुढे काय?

'सावित्रीबाई फुले नाट्यगृहाची प्रतीक्षा' बातमी वाचली. डोंबिवलीतील या नाट्यगृहातील पीओपीचा एक तुकडा पडल्याने स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालानुसार दुरुस्तीसाठी नाट्यगृह गेल्या पाच महिन्यांपासून बंद आहे आणि आणखी किती काळ बंद राहील याची शाश्वती नाही. त्यामुळे साहित्य व सांस्कृतिक नगरी डोंबिवलीतील नाट्यरसिकांना नाट्यप्रयोगांपासून वंचित राहावे लागत आहे. सावित्रीबाई फुले नाट्यगृहात मराठी नाट्य चित्रपट क्षेत्रातील दिग्गज गोविंद बल्लाळ देवल, राम गणेश गडकरी, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, बालगंधर्व, भक्ती बर्वे, पु. भा. भावे, सुधीर फडके यांची छायाचित्र व त्याखाली त्यांच्या कारकिर्दीचा उल्लेख असलेले 'देना बँक' पुरस्कृत धातूचे फलक दिसतात. मात्र त्यावरची अक्षरेच वाचता येत नाहीत. एवढी काळपट झाली आहेत. हिराबाई बडोदेकर, सरस्वती राणे, भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके, चित्रपट गुरू राजा परांजपे यांच्या नावाचे त्याच स्वरूपातील फलक आहेत. मात्र त्यांची छायाचित्रे गायब आहेत. पालिकेला मेलही पाठवला होता मात्र कल्याण-डोंबिवली महापालिकेची मालकी असलेल्या नाट्यगृहातील या महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष देण्याची महापालिकेला गरज वाटलेली नसावी. कल्याण-डोंबिवली महापालिकेला विनंती आहे की या नाट्यगृहाचे नूतनीकरण करताना संबंधितांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

**- मुरलीधर हरिश्चंद्र धंबा,** डोंबिवली

### डीजेला परवानगी देऊच नये

तुळशी विवाहानंतर लग्न समारंभाला सुरुवात झाली. लग्नातील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे वरात. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळे वरातीचा आनंद घेतात. नाच, गाणे, नातेवाईक, मित्रपरिवार यांचा जल्लोष यामुळे वातावरण उत्साहाने भारलेले असते. मात्र, आजकाल वरातीतील मोठ्या आवाजात वाजणारा डीजे ही एक फॅशन आहे. डीजेच्या कर्कश आवाजामुळे इतरांना त्रास होतो का, याचा विचार अनेकदा केला जात नाही. या मोठ्या आवाजामुळे ध्वनिप्रदूषण वाढते. वृद्ध, लहान मुले, तसेच आजारी लोकांना याचा त्रास होतो. कायद्यानुसार रात्री १० नंतर मोठ्या आवाजात संगीत वाजवणे अथवा ठरावीक डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणे हा गुन्हा आहे. तरीसुद्धा अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळीही डीजेचा कानठळ्या बसवणारा आवाज ऐकू येतो. अशा वेळी डीजे वापरण्यास मर्यादा घालणे आणि कायद्याचे कठोर पालन होत आहे ना याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. शाळा, रुग्णालये किंवा नागरिकांची वस्ती असलेल्या ठिकाणी डीजे वाजवण्याची अनुमती प्रशासनाने देऊच नये.

**- प्रीया बागडदेव,** छिंदवाडा

### नेत्यांनी 'लाज' शब्दाचीच वाट लावली

सध्या अजित पवार आणि शरद पवार ह्यांच्या दोन्ही पक्षांना एकत्र येऊन स्थानिक स्वराज्यांच्या निवडणुका जिंकण्यापेक्षा फक्त लढण्याचे वेड लागलं की काय अशी सामन्यजनाची धारणा झालेली आहे. उगाच नाटक करण्यापेक्षा विलीन व्हा आणि पार्थला भावी मुख्यमंत्री म्हणून मिरवा. कारण पार्थ पवारच्या जमीन घोटाळा प्रकरणापासून विलीन होण्याच्या बातम्यांनी जोर धरलेला दिसत आहे, मग एवढं लाजता का? नाही तरी सर्वपक्ष आणि नेत्यांनी लाज या शब्दाची कधीच वाट लावलेली आहे.

**- अरुण का. बधान,** डोंबिवली

### अवकाळीनंतरच्या थंडीतला गारवा

यंदाच्या पावसाने अक्षरशः कहर केला आणि सर्वांच्या नाकी दम आणला. मे महिन्याची अखेर ते ऑक्टोबर महिन्याची अखेर असे पाच महिने तो बरसत होता. या काळात अनेकदा पावसाने ढगफुटीचा अवतार धारण केला आणि राज्यात ठिकठिकाणी अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झाले. उभी पिके आडवी झाली, शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. यंदाची दिवाळीही पावसात भिजून गेली; परंतु सुदैवाने नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांनी देशातून काढता पाय घेतल्याने पाऊस आता थांबला आहे आणि सध्या वातावरणात गारवा पसरत असून पहाटे आणि सायंकाळच्या सुमारास मुंबईसह राज्यात थंडीची चाहूल लागली आहे. सध्या मुंबईत १८ अंश तापमान आहे. थंडीचा मोसम आवडत नाही अशी व्यक्ती विरळाच. गुलाबी थंडीची मजाच काही और असते. सध्याच्या मरगळलेल्या नकारात्मक वातावरणात थंडीच्या आगमनाने उत्सह पसरला आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे,** अंधेरी

### सक्षम असेल तरच उमेदवारी द्यावी!

महापालिका, नगरपालिका, नगर परिषद यांच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या आहेत. प्रत्येक कार्यकर्त्याला वाटते आपण नगरसेवक व्हावे. पक्षाने मला उमेदवारी दिली तर मी निवडून येईन. रुग्णालये, महापालिकेतील नागरिकांची कामे करण्यासाठी सदैव तत्पर असतात. यांना विभागातील नागरी समस्यांची माहिती असते. उमेदवारी अर्ज भरण्याची लगबग सुरू झाली की राजकीय पक्ष उमेदवार शोधण्यासाठी धावतात. मागील निवडणुकीत निवडून गेलेल्या नगरसेवकाने आपल्या मतदारसंघात कोणती विकासकामे केली. मतदारांना न्याय मिळवून दिला काय? तर उत्तर नाही असे मिळते. याचे कारण नगरसेवक म्हणून विविध समित्यांच्या सभांच्या कामकाजात किती सहभागी झाले, किती मासिक सभांना उपस्थित होते. सभागृहातील कामकाजात भाग घेतला. नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठवला. हे पाहणे आवश्यक आहे. पक्षाच्या नावावर, चिन्हावर निवडणूक येऊन पक्षांतर करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. नगरसेवक झाल्यावर महापालिका समजायला पाच वर्षे लागतात. राजकीय पक्षांनी मार्गदर्शन करावे, त्यांना सक्षम करावे नंतर उमेदवारी घ्यावी.

**- महादेव गोळवसकर,** कुर्ला

## राशिभविष्य

शुक्रवार, १४ नोव्हेबर-२०२५

**|| पंचांग ||**

आज मिती कार्तिक कृष्ण दशमी शके १९४७, चंद्र नक्षत्र पूर्वा फाल्गुनी, योग वैधृती, चंद्र राशी सिंह, भारतीय सौर २३ मार्गशीर्ष शके १९४७ शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५, मुंबईचा सूर्योदय ६.४५, मुंबईचा सूर्यास्त ६.००, मुंबईचा चंद्रोदय २.३४ उद्याची, मुंबईचा चंद्रास्त २.२२ पीएम, राहू काळ १०.५८ ते १२.२२. पंडित नेहरू जयंती, बाल दिन, क्रांतिवीर लहुजी साळवे जयंती.

**|| भविष्य ||**

**मेष :** मनोरंजनाकडे कल असेल

**वृषभ :** व्यवसाय-धंद्यात भरभराट होईल

**मिथुन :** सहकुटुंब प्रवासाचे योग घटित होत आहेत.

**कर्क :** कौटुंबिक सुख लाभेल.

**सिंह :** आपली मते इतरांना पटवून देण्यात यशस्वी राहाल.

**कन्या :** नोकरीत संबंधित व्यक्तींचे सहकार्य लाभेल.

**तूळ :** काहींना प्रवासाचे योग येतील.

**वृश्चिक :** सरकारी कामे विनाविलंब पूर्ण होतील.

**धनू :** आपल्या कामाचे कौतुक होईल.

**मकर :** मतभेद, वाद-विवाद घडू शकतात.

**कुंभ :** जुनी येणी वसूल होतील.

**मीन :** एखादा फायद्याचा सौदा हाती येईल.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायक्षेत्रे दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## सार्वजनिक स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

सार्वजनिक स्वच्छतेविषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची मोहीम पिंपरी-चिंचवड महापालिकेने सुरू केली आहे. 'फ' क्षेत्रीय कार्यालयाने १ नोव्हेंबर २०२५ ते १० नोव्हेंबर २०२५ या काळात जवळपास ५८ जणांवर दंडात्मक कारवाई करीत ६३ हजार रुपये दंड वसूल केले आहेत. पालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अति.आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई करण्यात आली आहे.

क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी देखील 'फ' क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची यासंबंधी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी बैठक घेत आदेश दिले होते. त्यानुसार 'फ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत उघड्यावर कचरा टाकणे, प्लास्टिकचा वापर करणे, कचरा वर्गीकरण न करणे, दुकानदारांकडे दोन डस्टबिन न ठेवणे अशा प्रकारच्या नियमभंगाविरुद्ध ५८ जणांवर कारवाई करीत दंड आकारण्यात आला.

कारवाईत सहा.आरोग्य अधिकारी महेश आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक कांचनकुमार इंदलकर, वार्ड आरोग्य निरीक्षक गौरव दराडे, महेंद्र साबळे, समाधान काटड यांनी सक्रिय सहभाग घेतला.

> "पिंपरी-चिंचवड शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर पुढील काळातही कठोर कारवाई करण्यात येईल.प्रशासन आणि नागरिकांचा परस्पर सहकार्यभाव कायम राहिला, तर शहर स्वच्छतेच्या क्षेत्रात आदर्श निर्माण करेल."
>
> – **विजय कुमार खोराटे,** अति.आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

> "पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून स्वच्छतेसाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा उद्देश केवळ नियमांची अंमलबजावणी करणे एवढाच नाही, तर नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी शिस्त आणि जबाबदारीची भावना निर्माण करणे हा आहे. स्वच्छ व सुंदर पिंपरी चिंचवड शहरासाठी नागरिकांनी देखील स्वच्छतेत सहभागी होऊन महापालिकेस सहकार्य करावे."
>
> - **डॉ. प्रदीप ठेंगल,** उप आयुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

### 'फ' क्षेत्रीय कार्यालयाने केलेली कारवाई :

- **बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर** – एकूण दंड वसूल २५ हजार रुपये
- **कचरा वर्गीकरण न करणे** – एकूण दंड वसूल ३ हजार ५०० रुपये
- **उघड्यावर कचरा टाकणे** – एकूण दंड वसूल १५ हजार रुपये
- **दुकानांमध्ये दोन डस्टबिन न ठेवणे** – एकूण दंड वसूल १६ हजार ५०० रुपये
- **सार्वजनिक ठिकाणी राडारोडा टाकणे** – एकूण दंड वसूल ३ हजार रुपये

## पैसे थकवल्याने 'पीएमपी'चे कर्मचारी उपचाराविना

### २० कोटींहून अधिक थकबाकी

◆ पुणे (प्रतिनिधी) :

पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) प्रशासनाने काही रुग्णालयांचे थकबाकीचे २० कोटींहून अधिक रूपये दिले नाहीत. पीएमपीतील कर्मचारी, अधिकारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सुविधेसाठी पीएमपीने शहरातील काही रुग्णालयांबरोबर करार केला आहे. पीएमपीमध्ये एकूण ८ हजार ३०० कर्मचारी आहेत. त्यांना उपचार मिळावेत यासाठी ७२ रुग्णालयांशी करार करण्यात आला आहे. रुग्णालयांचे २० कोटींहून अधिक वैद्यकीय बिले गेल्या काही महिन्यांपासून रखडवून ठेवली आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय उपचार बंद झाले आहेत. याचा नाहक त्रास पीएमपीचे कर्मचारी आणि कुटुंबीयांना सोसावा लागत आहे.

'अंशदायी वैद्यकीय सहाय योजनेंतर्गत' पीएमपीकडून कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे उपचार केले जातात. जवळपास ८ हजार ३०० कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना आणि त्यांच्या कुटुंबातील आई-वडील, पत्नी, दोन मुलांना या योजनेचा लाभ मिळतो. या योजनेपायी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या वेतनातून २ टक्के रक्कम कापली जाते. साधारण ७५ लाख रुपये दर महिन्याला वैद्यकीय योजनेसाठी जमा केले जातात. या योजनेत उपचाराचा खर्च पीएमपी ९० टक्के आणि १० टक्के स्वतः भरावा लागतो. शहरातील सर्व नामांकित अशा ७२ पेक्षा जास्त रुग्णालयांमध्ये उपचार घेण्याची सुविधा आहे. ३ हजार निवृत्त कर्मचाऱ्यांनाही या योजनेतून उपचार घेता येतात. त्यामुळे कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना दिलासा मिळतो. मात्र, गेल्या दीड वर्षांपासून पीएमपीकडून महत्त्वाच्या रुग्णालयांची बिले थकवली आहेत. परिणामी रुग्णालयांनीही उपचार देणे बंद केले आहे.

**रुग्णालयांची थकीत रक्कम :**

- पूना हॉस्पिटल -एक कोटी, दीनानाथ मंगेशकर -साठ लाख, केईएम- दोन कोटी, नोबेल -दीड कोटी, जहांगीर -एक कोटी, बुधराणी, सह्याद्री यांचाही समावेश आहे.
- आता अन्य रुग्णालयांनीही कर्मचाऱ्यांना उपचार देणे बंद केले आहे. त्यामुळे या रुग्णालयांमध्ये उपचार मिळावेत म्हणून प्रयत्न करावेत, अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

**वेळेत बिल भरा :**

पीएमपीकडून या रुग्णालयांच्या बिलांचे पैसे टप्प्याटप्प्याने अदा केले जातात. नुकतेच पीएमपीकडून नोबेल रुग्णालयाचे १ कोटी बिल भरले आहे. तरीही रुग्णालयाकडून उपचार बंद केले आहेत. इतर सरकारी विभागाची बिलेही थकीत असली तरी त्यांना उपचार दिले जातात. पण, पीएमपीचे बिल थकले तर उपचार बंद करणे योग्य नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. रुग्णालयांची बिले वेळेत भरली पाहिजे, असे कर्मचारी संघटनेने मागणी केली आहे.

## हिंजवडी, वाकडमध्ये प्रदूषणाचा राक्षस

### रहिवासी उपसणार आंदोलनाचे हत्यार

◆ वाकड (प्रतिनिधी) :



हिंजवडी, ताथवडे, वाकडमध्ये प्रदूषणाने नागरिकांचे रोजचे जगणे कठीण होऊन बसले आहे. येथील रेडीमिक्स काँक्रिट (आरएमसी) प्लांट्स, सर्रास कचरा जाळण्याचे प्रकार व मालवाहू जड वाहनांची रहदारी या प्रकारांनी सर्वत्र प्रदूषणचा विळखा बसत आहे. हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस घसरत असून रहिवाशांना रोजच मास्क घालून बाहेर पडावे लागत आहे. वाढत्या प्रदूषणाबाबत कोणतीही कारवाई केली जात नसल्याने महापालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा रहिवाशांनी दिला आहे. याबाबत वाकड व हिंजवडी पोलिसांबरोबर रहिवाशांची बैठक झाली. त्यामध्ये रहिवाशांनी तीव्र नाराजी दाखवली. प्रतिबंधात्मक आदेश असतानाही अनेक बांधकाम कंपन्या आणि आरएमसी युनिट्सचे वाहनचालक नियम धाब्यावर बसवत असल्याची तक्रार नागरिकांनी केली.

आरएमसी प्लांट्समधून दररोज प्रवास करणाऱ्या अवजड वाहनांची संख्या वाढतच आहे. रस्त्यांवर सर्वत्र धूरळा पसरत आहे. वाकड-ताथवडे गृहनिर्माण हाउसिंग सोसायटी फोरमच्या माध्यमातून ३८ सोसायट्यांच्या प्रतिनिधींनी पोलिसांना निवेदन सादर केले. पालिका, पोलिस आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने याप्रश्नी तातडीने कारवाई केली नाही; तर वाकड-हिंजवडीकर रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशारा सोसायटी फोरमने दिला आहे.

**अनेकदा निवेदने देऊनही ठोस उपाय नाहीः**

याप्रश्नी रहिवाशांनी प्रशासनाला अनेक वेळा सूचना, निवेदने आणि तक्रारी केल्या आहेत. तरीही परिस्थितीत कोणताही ठोस बदल झालेला नाही. ताथवडे येथे एका बाजूला पुनावळे, एका बाजूला वाकड, एका बाजूला ग्रामपंचायत हद्द आहे. येथे सुमारे २० पेक्षा अधिक आरएमसी प्लांट आहेत. अवजड वाहनांमुळे वर्दळ सुरू असते.

**कचरा जाळणे :**

काही महिन्यांपासून फेज तीन हद्दीत अज्ञातांकडून कचरा जाळला जातो. धूर आणि दुर्गंधीमुळे रहिवाशांना प्रदूषणाचा त्रास भोगावा लागतो. क्वाड्रन सर्कल जवळील यू-५७ रेसिडेन्शियल सोसायटीमागे बाहेरून आणलेला कचरा टाकला जातो. रात्रीच्या अंधारात तो पेटवला जातो असे स्थानिक सांगतात. रहिवाशांच्या मते, दररोज ८-१० वेळा ट्रॅक्टरमधून कचरा टाकला जातो आणि आग लावली जाते.

> " बांधकाम साहित्य असणाऱ्या अवजड वाहनांमधून उडणारी धूळ, कचरा हा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचा भंग आहे. रस्त्यांवर धुळीचा जाड थर साचत आहे. मोठ्या प्रमाणात वायुप्रदूषण होत असून नागरिकांचे आरोग्य बिघडत चालले आहे. शुध्द हवा मिळणे कठीण झाले आहे. मास्क घालून फिरावे लागत आहे.
>
> **- एक दक्ष नागरिक**

## निर्मला सीतारामण यांची बनावट सही; ९९ लाख उकळले

◆ पुणे (प्रतिनिधी) :

शहरात पुन्हा एकदा डिजिटल अरेस्ट घोटाळ्याची धक्कादायक घटना घडली आहे. एका ६२ वर्षीय निवृत्त एलआयसी महिला अधिकाऱ्याकडून सायबर गुन्हेगारांनी तब्बल ९९ लाख रुपये उकळले आहेत. आरोपींनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांच्या नावे बनावट सही करून खोटे अटक वॉरंट बनवून महिलेची फसवणूक केली. पुणे सायबर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कोथरूडमध्ये वास्तव्य असणाऱ्या महिलेच्या मोबाईलवर ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात 'डेटा प्रोटेक्शन एजन्सी' या नावाने एकाचा फोन आला. त्याने महिलेच्या आधार कार्डाशी जोडलेल्या मोबाईल नंबरचा काही फसवणुकीच्या व्यवहारांसाठी वापर झाल्याचे सांगत तिची चौकशी केली. त्यानंतर स्वतःला वरिष्ठ पोलीस अधिकारी भासवत जॉर्ज मॅथ्यू नामक व्यक्तीशी तिचा व्हिडिओ कॉलवर संपर्क झाला.

व्हिडिओ कॉल करून मॅथ्यूने महिलेवर मनी लाँड्रिंगचा आरोप केला आणि तिची बँक खाती गोठवली जातील असा इशारा दिला. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांच्या नावाची खोटी सही असलेले बनावट अटक वॉरंट तयार करून महिलेच्या मोबाईलवर पाठवले. "तुम्हाला वयामुळे डिजिटल अटक अंतर्गत ठेवले जाईल आणि तुमच्या सर्व बँक व्यवहारांवर लक्ष ठेवले जाईल," असे सांगून गुन्हेगारांनी तिच्याकडून पैसे हस्तांतरित करून घेतले. महिलेने सायबर गुन्हेगारांच्या सांगण्यानुसार वेगवेगळ्या बँक खात्यांवर एकूण ९९ लाख रुपये ट्रान्सफर केले. काही दिवसांनी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तिने पुणे सायबर पोलिसांकडे तक्रार केली. सध्या ठाणे सायबर क्राईम विभागाच्या मदतीने या प्रकरणाचा तपास सुरू आहे. सायबर पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी 'डेटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडिया' आणि 'टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडिया' अशा सरकारी संस्थांच्या नावांचा गैरवापर करत आहेत.

## पुणे जिल्ह्यात बिबट्या दिसताच 'सायरन'

**बेल्हे :** जुन्नर आणि अन्य तालुक्यातील बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांवर उपाय म्हणून, वनमंत्री गणेश नाईक यांनी 'एआय' यंत्रणेच्या माध्यमातून बिबट्याच्या हालचाली निदर्शनास येताच सायरन वाजवण्याची यंत्रणा पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यात करण्याचे आदेश दिले आहेत. पुणे जिल्ह्यासाठी एक हजार पिंजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. उपग्रह आधारित इंटरनेट जोडणी असलेल्या एआयच्या माध्यमातून सायरन वाजेल. काल बेल्हे (ता. जुन्नर) येथे बिबट्याच्या हल्ल्यात बळी पडलेल्या ज्येष्ठ नागरिक यांच्या घरी आले असता नाईक यांनी लोकांशी संवाद साधला.

## वेचक

### कुठल्या वक्तव्याचा खुलासा करू ?



**राष्ट्रवादीच्या रूपाली पाटील यांचा प्रश्न**

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश प्रवक्तेपदावरून पायउतार झालेल्या रूपाली पाटील यांनी नेमके कुठल्या वक्तव्याचा खुलासा केला पाहिजे अशी विचारणा करत प्रदेश कार्यालयाला खुलासा पत्र पाठवले आहे. विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये? याचा खुलासा प्रदेश कार्यालयाकडे ७ दिवसांच्या आत करावा असे पत्र सरचिटणीस यांच्याकडून पाटील यांना देण्यात आले होते. फलटण येथील डॉक्टर आत्महत्येप्रकरणी आपल्याच पक्षातील रुपाली चाकणकरांविरूध्द आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल पाटील यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. आपणास खुलासा येणे प्रमाणे राज्य महिला आयोग अध्यक्ष तसेच प्रदेशाध्यक्ष यांचे बाबत नक्की कोणते वक्तव्य शिस्तभंग करणारे आहे. याविषयी नोटीस मध्ये कोणताही माहिती नसल्याने त्याबाबत खुलासा देणे शक्य नाही. सविस्तर एखादे वाक्य आपण आपल्या नोटीसीमध्ये नमूद केले असते तर त्यावर मला खुलासा करणे योग्य झाले असते. तसेच राज्य महिला आयोग व राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेश अध्यक्ष स्वतंत्र विभाग आहेत अशी पाटील यांची भूमिका आहे. फलटणच्या डॉक्टर आत्महत्या प्रकरणी महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी केलेल्या वक्तव्यामुळे रूपाली ठोंबरे यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. त्यांनी मांडलेल्या भूमिकेमुळे रूपाली ठोंबरे यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. त्यांना पक्षाच्या प्रवक्तेपदावरून हटवण्यात आले आणि त्यानंतर त्यांना पक्षाच्या स्टार प्रचारकांमध्येसुद्धा संधी देण्यात आली नाही. स्टार प्रचारकांसाठी रूपाली ठोंबरे यांना वगळून रूपाली चाकणकरांना संधी देण्यात आली. दरम्यान पक्षाकडून रूपाली ठोंबरे यांना नोटीस बजावण्यात आली होती. त्यामुळे रूपाली ठोंबरे आता पक्ष सोडतील अशा चर्चा रंगल्या होत्या. स्वतःची बाजू मांडण्यासाठी रूपाली ठोंबरे यांनी पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेऊन आपली आपले मत समोर ठेवले.

### डोक्यात गोळी झाडून व्यावसायिकाला केले ठार

**पुणे :** आर्थिक वादातून मित्रांनी डोक्यात गोळी झाडून व्यावसायिकाला ठार केल्याची घटना चऱ्होलीतील वडमुखवाडी येथील अलंकापुरम रस्ता येथे बुधवारी सायंकाळी घडली. नितीन गिलबिले असे मृत व्यावसायिकाचे नाव आहे. अमित पठारे, विक्रांत ठाकूर अशी संशयित आरोपींची नावे आहेत. नितीन गिलबिले आणि अन्य काही जण अलंकापुरम रस्त्यावरील शेडजवळ थांबले असता नितीन यांचा मित्र अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर हे वाहनाने तिथे आले. त्यांनी गिलबिले यांना कारमध्ये बसवले. त्यानंतर गिलबिले यांच्या अलंकापुरम रस्त्यावरील हॉटेलच्या दिशेने ते गेले. त्यांनी गिलबिले यांच्यावर गोळी झाडली. त्यात नितीन यांचा मृत्यू झाला, आरोपी पळून गेले. घटनेची माहिती मिळताच दिघी तसेच गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गिलबिले यांनी काही महिन्यांपूर्वी अलंकापुरम रस्त्यावर हॉटेल सुरू केले होते. तसेच, व्यावसायिक गाळे बांधून त्यांनी भाडेतत्त्वावरही दिले. जमीन खरेदी-विक्रीचा व्यवसायदेखील ते करत होते.

## महिला बचत गटांमार्फत दरमहा १० लाखांहून अधिक उलाढाल अपेक्षित

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :




> महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण करण्यासाठी 'सखी आंगण' हा उपक्रम मोठी भूमिका बजावणार आहे. महिला बचत गटांना व्यवसायाचे व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या कौशल्याला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न महापालिकेमार्फत करण्यात आला आहे. हा उपक्रम महिलांच्या विकासाच्या प्रवासात परिवर्तन घडवणारा ठरेल.
>
> - **श्रावण हर्डीकर,** आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे नुकतेच आकुर्डी येथे महिला व बाल कल्याण योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या खाद्य पदार्थ केंद्रातील ४९ गाळ्यांचे महिला बचत गटांना वाटप करण्यासाठी देशातील पहिला ई- लिलाव घेण्यात आला होता. या खाद्यपदार्थ केंद्राला 'सखी आंगण' हे नाव देण्यात आले आहे. या केंद्राचे प्रतिकचिन्हदेखील निश्चित करण्यात आले आहे. सदर केंद्राचे संचालन पिंपरी-चिंचवड शहरातील महिला बचत गटांमार्फत करण्यात येणार असून, महिलांच्या आर्थिक स्वावलंबन आणि सक्षमीकरणाच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

पालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसरात खाद्यपदार्थ विक्री केंद्राची उभारण्यात आले आहे. येथील गाळे विविध महिला बचत गटांना खाद्य पदार्थ विक्री व व्यवसायासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. हे गाळे महिला बचत गटांना भाडेतत्वावर देण्यासाठी पालिका आयुक्त श्रावण हर्डीकर व अति. आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली ई-लिलाव करण्यात आला होता. प्रति गाळा १५ हजार १०० ते ३२ हजार रुपयांपर्यंत लिलाव दर नोंदविण्यात आले. एकूण ४९ गाळ्यांपैकी २ गाळे दिव्यांग महिला बचत गटांसाठी, १ गाळा तृतीयपंथी गटासाठी, १ गाळा कोविड योद्धा महिला गटासाठी, २ गाळे आदिवासी गटांसाठी, ३ गाळे दीनदयाळ अंत्योदय योजनेअंतर्गत गटांसाठी आणि उर्वरित ४० गाळे पीसीएमसी सक्षम अंतर्गत नोंदणीकृत महिला बचत गटांसाठी देण्यात आले.

## निश्चित अंदाज घेऊनच उमेदवारीबाबत निर्णय

◆ पुणे (प्रतिनिधी) :

**निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्पष्टीकरण**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपचे निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे जबाबदारी सोपवल्यानंतर आज येथील पक्ष कार्यालयात बैठक घेतली."महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमचं स्पष्ट सर्वेक्षण सुरु आहे. या सर्वेक्षणातून सर्व अंदाज घेऊन आम्ही उमेदवारीबाबत निर्णय घेणार आहोत. आमच्याकडे उमेदवारीसाठी इच्छुकांची संख्या जास्त असली तरीही, ज्याला जनतेच्या मनात स्थान आहे, नगरसेवक म्हणून ज्याला जनतेची मान्यता आहे आम्ही अशाच उमेदवारांची निवड करणार आहोत" असे स्पष्टीकरण बावनकुळे यांनी दिले. ते पुढे म्हणाले " स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती ५१ टक्क्यांच्या वर मतं घेऊन येणार, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, शिवसेनेचे मंत्री उदय सामंत, शंभुराजे देसाई यांच्यासह आम्ही समन्वय समितीची बैठक घेतली. जास्तीत जास्त ठिकाणी महायुतीद्वारे निवडणूक लढवण्याचा प्रयत्न असेल असे ते म्हणाले.

## आरक्षण ठरताच इच्छुकांकडून तिकिटासाठी मनधरणी, पक्ष कार्यालये भरली !

◆ पुणे (प्रतिनिधी) :



पालिकेच्या प्रभागांचे आरक्षण निश्चित झाल्याने इच्छुकांकडून उमेदवारीसाठी जुळवाजुळव सुरू आहे. ज्या प्रभागांमध्ये महिला आरक्षण पडले आहे, तेथे इच्छुकांनी कुटूंबातील महिलांना उभे केले आहे. त्यांचे बॅनर्स सोशल मिडीयात झळकविण्यासही सुरूवात झाली आहे. विद्यमान नगरसेवक गणित कसे बसवायचे याचे अंदाज बांधत असून पक्षातून तिकीट मिळविण्यासाठीही चाचपणी सुरू केली आहे. अनेकांनी सोशल मिडीयाद्वारे प्रचाराला सुरूवात केली आहे. पक्ष कार्यालय, नेत्यांचे कार्यक्रम इच्छूक उमेदवारांच्याही भेटी घेण्यास सुरूवात केली आहे. अनेक इच्छुकांकडून बुधवारी दिवसभर पालिकेत प्रभागातील समस्यांचे निवेदन देऊन अधिकाऱ्यांची भेट घेत फोटोसेशन सुरू केले.

सर्वसाधारणपणे ४ सदस्यांच्या प्रभागात अपक्ष निवडून येणे कठीण असते. निवडणुकीसाठी राष्ट्रीय तसेच प्रादेशिक पक्षाची उमेदवारी मिळाल्यास निवडणूक सोपी जाते. आरक्षण सोडतीनंतर अनेकांनी तिकिटासाठी अंतिम फिल्डींग तसेच चाचपणी सुरू आहे. इच्छुकांकडून तिकिट हव्या असलेल्या जागेसाठी पक्षांच्या शहराध्यक्षांशी आज दिवसभर संपर्क साधला जात होता. अनेक इच्छुकांनी पक्ष कार्यालय गाठत तिथे गर्दी केली होती. अनेकजण भाजपकडून लढण्यास इच्छूक असून संधी मिळाली नाही तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून तिकिटासाठी चाचपणी केली जात आहे. काही जण राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) पदाधिकाऱ्यांशी चर्चा करत असल्याचे दिसून येते.

पालिकेच्या १६५ मधील ८३ जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. विद्यमान नगरसेविकांसह अनेक प्रभागांमध्ये खुल्या जागांवर महिलांचे आरक्षण आल्याने अनेक नगरसेवकांची अडचण झाली आहे. ते निवडणुकीच्या मैदानात घरातील महिलांना उतरवत आहेत. इच्छुकांनी कारभारणीला फ्लेक्सवर चमकवले आहे.

## प्रारूप मतदार यादीवरील सूचना व हरकती स्वीकारण्यासाठी अधिकारी नियुक्त

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने, महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघांची मतदार यादी प्रभागनिहाय विभाजित करून प्रारूप मतदार यादी १४ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर नागरिकांना हरकती व सूचना दाखल करण्यासाठी १४ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर २०२५ ही मुदत देण्यात आली आहे. या काळात नागरिकांकडून प्रारूप मतदार यादीवर येणाऱ्या हरकती व सूचना स्वीकारण्यासाठी अ, ब, क, ड, ई, फ, ग आणि ह अशा क्षेत्रीय कार्यालयानिहाय अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती प्राधिकृत अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे -पाटील यांनी दिली.

नियुक्तीबाबतचे आदेश पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक विभागाच्या वतीने जारी करण्यात आले आहेत. प्रारूप मतदार यादीवर प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचना स्वीकारणे, आलेल्या हरकती व सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे, हरकत किंवा सूचना दाखल केल्याची संबंधितांना पावती देणे, राज्य निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेश-निर्देशानुसार कामकाज करणे आदी कामाची जबाबदारी हरकती व सूचना स्वीकारण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आली आहे. सदर कर्मचाऱ्यांनी हे कामकाज स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, महापालिकेचे सहायक नगररचनाकार प्रशांत शिंपी, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, सहाय्यक आयुक्त राजीव घुले, किरणकुमार मोरे, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, प्रशासन अधिकारी सरीता मारणे, संगीता घोडेकर-बांगर व कार्यालय अधीक्षक रमेश यादव या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली करावे, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## दौंड शहरात कट्टर शत्रू एकत्र ?

**दौंड :** दौंड नगरपालिका निवडणुकीसाठी एकमेकांचा जाहीर उद्धार करणारे नेते एकत्र आले आहेत. दौंड नगरपालिकेचे नगराध्यक्षपद हे महिला ओबीसीकरिता राखीव आहे. दौंड नगरपालिका निवडणुकीमध्ये एका बाजूला नागरिक हितसंरक्षण मंडळ, भाजप, आरपीआय आघाडी, पीपल्स रिपब्लिकन पार्टी व इतर मित्रपक्ष आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) शिवसेना, काँग्रेस व इतर त्यांचे छोटे मित्रपक्ष दुसऱ्या बाजूला आहेत.

नागरिक हितसंरक्षण मंडळ व भाजप एकत्रित निवडणूक लढविण्याची शक्यता आहे. जाणकार सांगतात दौंडच्या विकासासाठी भाजपचे विद्यमान आमदार राहुल कुल यांनी कोट्यवधींचा निधी दिला. राष्ट्रवादी गटातदेखील रमेश थोरात, वीरधवल जगदाळे यांच्यावर जबाबदारी आहे. त्यांनी अद्याप उमेदवार जाहीर केला नाही. त्यामुळे प्रेमसुख कटारिया आणि भाजपचे आमदार राहुल कुल त्रस्त झाले आहेत.

### अपघातानंतरही पुणे ते जगन्नाथ पुरी सायकल यात्रा यशस्वी

## लोणावळ्यातील पोलीस उपनिरीक्षकाच्या जिद्दीला सलाम !

◆ मावळ (प्रतिनिधी):

लोणावळा पोलीस ठाण्यात उपनिरीक्षक असलेले कर्तव्यदक्ष अजय दरेकर यांनी आपल्या दुर्दम्य जिद्दीच्या बळावर शारीरिकदृष्ट्या कमकुवत असतानाही पराक्रम केला आहे. अपघातात त्यांच्या पायाला फ्रॅक्चर झाले, दोन प्लेटस बसवण्यात आल्या. १३ खिळे टाकून पायाचे ऑपरेशन यशस्वी झाले. त्यांनी ऑपरेशनंतर केवळ सहा महिने विश्रांती घेतली. त्यानंतर एखाद्या फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेतली. सायकल चालवण्याचा छंद जोपासला. दररोज २०० ते २५० किलोमीटरहून अधिक सायकल चालवीत जवळपास साडेसात दिवसात ही यात्रा १ हजार ७०० किलोमीटरचे अंतर कापून जगन्नाथ पुरिपर्यंत यात्रा पूर्ण केली आहे.



पोलीस खात्यात सेवा बजावत असताना त्यांना सायकलचा छंद जडला. गंभीर अपघातातून स्वतःला पुन्हा नव्याने उभे केले तसेच हे करताना त्यांनी आपल्या सायकलप्रेमाकडे जराही दुर्लक्ष होऊ दिले नाही. पोलीस दलात असूनही त्यांची अध्यात्माकडे ओढ आहे. ते सायकलप्रवास करून नेहमीच विविध धार्मिक स्थळी भेटी देतात. वर्षभरापूर्वी ११ नोव्हेंबरलाच निवडणुकीचे काम आटोपून ते लोणावळ्यावरून आपल्या घरी परतत असताना त्यांची मोटार सायकल वडगाव मावळ जवळील जांभूळ फाटा येथे घसरली. या दुर्देवी अपघातात गाडी पायावर पडल्याने त्यांच्या डाव्या पायास गंभीर दुखापत झाली. पायला फ्रॅक्चर करावे लागले. सदर प्रसंग अत्यंत गंभीर होता. या काळात नोकरीवर जाऊन सेवा बजावणेही कठीण होते. त्यांना आपल्या सायकल चालवण्याच्या छंदालाही बाजूला ठेवावे लागणार होते. आयुष्याची परीक्षा घेणाऱ्या काळात त्यांना त्यांची पत्नी आणि मुलांनी मोलाची साथ दिली.

सहा महिन्यांचा आराम केल्यानंतर ते पुन्हा दररोज सकाळी सायकल चालवण्याचा सराव करू लागले. त्यांच्या मित्रांनी जगन्नाथपुरीला जाण्याची कल्पना मांडली आणि त्यांनी तात्काळ होकार भरला. एवढे मोठे अंतर सायकलीद्वारे पार करणे शक्य आहे का याबाबत त्यांना शंका होती. यावेळी त्यांचे कुटुंब आणि मित्रपरिवाराने त्यांना भरोसा दिला. मित्र युवराज पाटील यांच्या नियोजनाखाली चार जण पुण्याहून जगन्नाथपुरीसाठी दोन तारखेला रवाना झाले. दरेकर यांनी कोणत्याही परिस्थितीत खचून न जाता जिद्दीने आणि सातत्याने प्रयत्न केले तर यश नक्कीच मिळते हे दाखवून दिले. सोमवारी(ता. १०) दुपारी श्री जगन्नाथ पुरी धाम येथे सायकल यात्रा संपन्न झाली.

## 'बालकुमार'चा सुवर्णमहोत्सवी सांगता कार्यक्रम आज

◆ पुणे (प्रतिनिधी) :

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था
नों. क्र. एफ-९२०/पुणे

मुलांमध्ये वाचन संस्कार रुजविण्यासाठी ५० वर्षांपासून कार्यरत अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचा सुवर्णमहोत्सवी सांगता समारंभ उद्या (१४ नोव्हें) सकाळी १० वाजता नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. 'बालकुमार सुवर्णगाथा' या स्मरणिकेच्या प्रकाशन, बाल साहित्यिकांचा गौरव तसेच बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचा सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, पद्मश्री गिरीश प्रभुणे असणार आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी आदी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत असे संस्थेचे कार्यवाह प्रसाद भडसावळे, अध्यक्ष माधव राजगुरू व कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे कळवले आहे.

कार्यक्रमाची सुरूवात महाराष्ट्र गीताने केली जाणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या १०० मुला-मुलींना बाल साहित्याची पुस्तके भेट दिली जाणार आहेत. दिलीप प्रभावळकर, बाबा भांड, माधुरी पुरंदरे, राजीव तांबे, ल. म. कडू, सलीम सरदार मुल्ला, आबा महाजन, संजय वाघ, डॉ. संगीता बर्वे, एकनाथ आव्हाड, भारत सासणे आणि डॉ. सुरेश सावंत या साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कार प्राप्त लेखकांचा सन्मान करण्यात येणार आहे. आत्तापर्यंत झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष राजीव तांबे, डॉ. संगीता बर्वे, ज्येष्ठ संपादक महावीर जोंधळे, डॉ. न. म. जोशी, सूर्यकांत सराफ, गोविंद गोडबोले, मदन हजेरी यांनाही सन्मानित करण्यात येणार आहे.

# किलबिल



## काव्यकोडी

**एकनाथ आव्हाड**

१) क्षणभंगूर गोष्टीला म्हणती
अळवावरचे पाणी
दुर्मिळ संधीला म्हणतात
कपिलाष्ठीचा योग, पर्वणी

निरूपद्रवी मनुष्याला
म्हणतात गोगलगाय
अति झोपाळू मनुष्याला
म्हणतात तरी काय?

२) काळासावळा
अंगतपंगत
आरडाओरडा
गंमतजंमत

अघळपघळ
ठावठिकाणा
काय म्हणतात बरं
या शब्दांना?

३) होकाराच्या विरुद्ध
नकार येतो
विजयाच्या विरुद्ध
पराजय होतो

सजीवच्या विरुद्ध
निर्जीव होते सारे
सुगमच्या विरुद्ध
काय येते बरे?

उत्तर -
१) कुंभकर्ण
२) जोडशब्द
३) दुर्गम

## आपला हात जगन्नाथ

दीनदुबळ्यांना नेहमीच
मदतीचा हात द्यावा
माणुसकी जपेल त्याला
मनापासुनी हात जोडावा

उतू नये, मातू नये
हात आखडुनी खर्च करावा
कामधाम करतेवेळी
भरभर आपला हात चालावा

चूक झाल्यास कबूल करावी
हात झटकुनी का बसावे?
तुरी हातावरी देईल त्याच्या
हात धुऊन पाठीस लागावे

संकट धावून आले जरीही
हातपाय गाळून बसू नये
संकटाशी दोन हात करावे
संकटापुढे हात टेकू नये... !

दुसऱ्यांच्या कष्टास जाणावे
आडवा हात त्यावर मारू नये
हातापाया पडुनी कधीही
फायदा स्वतःचा साधू नये

उगारण्यासाठी नाही बरं
उभारण्यासाठी आहेत हात
ध्यानात ठेवावे आयुष्यात
आपला हातच जगन्नाथ...!

eknathavhad23@gmail.com





**चित्र रंगवा विजेता : शंतनु उमेश पातेरे**
**शाळा : सेंड मायकल स्कूल माहिम**



**परीक्षक : मनिषा दिवाकर जाधव**
**मुख्याध्यापिका**
**सुषमा पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज, कामोठे. नवी मुंबई.**



## हवेचे घटक



**कथा**
**प्रा. देवबा पाटील**



सीता व निता या जुळ्या बहिणींच्या आईवडिलांना त्यांना नुसते परीक्षांकित माहितीकोष बनवायचे नव्हते, परीक्षेत जास्तीचे गुण मिळविणारे पुस्तकी साचे घडवायचे नव्हते, तर जीवनपरीक्षांसाठी गुणवान, सक्षम बनवायचे होते. आपल्या देशासाठी संस्कारक्षम, विवेकशील, चौकस, निरीक्षक, व्यवहारी व सकस निर्णयशक्तीचे सुजाण नागरिक घडवायचे होते. त्या जरी मुली होत्या तरी त्यांचे आई-वडील त्यांना कशाचीही उणीव भासू देत नव्हते.

त्यांच्यासोबत कोणताच भेदभाव करीत नव्हते. वाचनासोबत त्यांना पदोपदी सुयोग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभायचे. त्यामुळे त्या दोघींची बुद्धीमत्तेसोबत मानसिक शक्ती उन्नत होत होती. वैचारिक पातळीही उंचावत होती. मनोबल वाढत होते. योगायोगाने त्यांची प्राध्यापिका मावशी त्यांच्याकडे आलेली होती. या दोघीही रोज सायंकाळी मावशीकडून आपल्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरे काढून घेत होत्या. त्यादिवशी संध्याकाळी त्या घराच्या गच्चीवर ज्ञानवर्धक चर्चा करत बसल्या होत्या.

"मावशी, तू आम्हाला हवेचे घटक सांगत होतीस ना?" निताने मध्येच आठवण करून दिली.

"सांगते ना गं. तुमच्या प्रश्नांनी थोडे थोडे विषयांतर होते. तुमच्या जिज्ञासांचा मलाही आनंद होतो व मी तुम्हाला आणखी नवनवीन माहिती सांगते."

मावशी म्हणाली, "तर हवेचे घटक म्हणजे हवेत अनेक वायू असतात. सर्वात जास्त म्हणजे जवळपास ७८ टक्के नत्रवायू असतो. २१ टक्के प्राणवायू असतो. हवेत उद्जनवायूही थोडाफार असतो."

"उद्जन वायू? आम्ही तर हे नाव कधीच ऐकले नाही." दोघीही एकदम आश्चर्याने प्रश्नार्थक चेहरा करीत बोलल्या.

"हा कोणता वायू आहे मावशी?" सीताने विचारले.

मावशी म्हणाली, "उद म्हणजे उदक, पाणी. तर उदक निर्माण करणारा उद्जन म्हणजेच हायड्रोजन. तसेच कर्बवायूचेही थोडेफार प्रमाण हवेत असते. हवेत पाण्याची वाफ व धूळही असते. हवेत अरगॉनसारखे निष्क्रिय वायूही अत्यल्प प्रमाणात आढळतात. हवा ही खूप उपयुक्त आहे. हवेविना सजीव जगूच शकत नाही. म्हणून हवा नेहमी शुद्ध व प्रदूषणमुक्त राखावी."

"मावशी, निष्क्रीय वायू म्हणजे कसे वायू?" निताने विचारले.

"निष्क्रिय वायू म्हणजे असे वायू की जे रासायनिक प्रक्रियांमध्ये भाग घेत नाहीत. ते रासायनिकदृष्ट्या उदासीन असल्यामुळे त्यांना उदासीन वायूसुद्धा म्हणतात. त्यांची अन्य मूलद्रव्यांसोबत संयुगे होत नाहीत म्हणून ते स्थिर असतात व त्यांना अक्रिय वायूसुद्धा म्हणतात. अरगॉन, हेलियम, निऑन, क्रिप्टॉन, व झेनॉन हे निष्क्रिय वायू एकूण एक टक्क्यापर्यंत हवेत आढळतात. हे वायू रंगहीन, गंधहीन व चव नसलेले असतात. तुम्ही रंगीत विद्युत दिवे बघितले आहेत का?" मावशीने विचारले.

"हो. खूपदा बघितले आहेत मावशी." सीता म्हणाली.

"आणि पुष्कळ ठिकाणी पाहिले आहेत मावशी." निताही उत्तरली.

"तर त्या रंगीत विद्युत दिव्यांमध्येही निष्क्रिय वायूच वापरतात. वेगवेगळे अक्रिय वायू वेगवेगळ्या रंगाचा प्रकाश देतात, तर काही रंगांकरिता दोन वायूंचे मिश्रणही विद्युत दिव्यांमध्ये वापरतात. असे ते निष्क्रिय वायूंचे विद्युत दिवे छान छान रंगीत प्रकाश देतात." मावशीने स्पष्टीकरण दिले.

अशा त्यांच्या विज्ञानावरील गप्पागोष्टी मस्त रंगात आल्या असतांना अंधार पडल्याचे त्यांना भानही राहिले नाही.

खालून घरातून आईने त्यांना खाली जेवणासाठी येण्याकरीता आवाज दिला. तो आवाज ऐकून मावशीने त्यांना माहिती सांगणे थांबवले व चला आता आपण खाली जाऊ या. असे म्हटले नि ती उभी राहली व जिन्याकडे निघाली.

मावशी उठून उभी राहताबरोबर सीता व निताही उभ्या राहिल्यात. त्यांनी सतरंजी गोळा केली. तिची नीट घडी केली. ती सीताने हाती घेतली व त्या दोघी बहिणी मावशीपाठोपाठ खाली उतरण्यासाठी जिन्याकडे निघाल्या.

## आनंदी मन

**कथा**
**रमेश तांबे**



राधा घरात एकटीच बसली होती. समोर वह्या पुस्तके उघडून ती त्यात काहीतरी बघत होती. तिचा चेहरा उदास वाटत होता. तेवढ्यात घराच्या खिडकीत एक पोपट आला आणि म्हणाला, "राधा राधा अशी उदास का बसलीस. चल आपण खेळायला जाऊ. तुझ्या मित्रांना बोलावू." राधाने आवाज ऐकून इकडे-तिकडे बघितले, पण तिला कोणीच दिसले नाही. तिने पुन्हा आपली मान पुस्तकात घातली. "राधा, राधा अगं इकडे तरी बघ जरा, तुझा मित्र पोपटराव खिडकीत बसलाय." राधाचे डोळे चमकले. तिने खिडकी पूर्ण उघडली. तर तिथं एक हिरव्या पंखांचा, लाल भडक चोचीचा पोपट राधाकडे बघून हसत होता. त्याला पाहून क्षणभर ती हसली आणि पुन्हा पुस्तकात बघू लागली. तसाच उदास चेहरा करून!

मग पोपट म्हणाला, "अगं राधा काय झालं, सांग तरी मला." तशी राधा म्हणाली, "तुला सांगून काय उपयोग? तुला ना शाळा ना अभ्यास! ना पाढे पाठ करायचे, ना गणितं सोडवायची ! मी बघ कधीपासून ही गणितं सोडवायचा प्रयत्न करतेय, पण एक गणित सुटत नाही. करू तरी काय आणि विचारू तरी कुणाला!" ते ऐकून पोपट हसला, पोट धरून हसला आणि आपले पंख पसरून घरभर उडत राहिला. शेवटी राधाच्या खांद्यावर जाऊन बसला. मग पोपट म्हणाला, "मला सांग राधा, झाले तरी काय? अशी कोपऱ्यात बसून घरात अंधार करून, दारे-खिडक्या लावून कोण अभ्यास करतं का? अन् अशी उदास का आहेस?"

राधा सांगू लागली, "आज आईचं आणि माझं भांडण झालं जेवणावरून. कारल्याची भाजी खा म्हणून माझ्या मागे लागली. मग मी तशीच उठून आले माझ्या खोलीत ! काय करणार उद्या परीक्षा आहे. तीही गणिताची ! आणि ही गणितंदेखील एवढी अवघड आहेत ना काही केल्या सुटत नाही." मग पोपट म्हणाला, "राधा तू तर एक हुशार मुलगी आहेस. मग तुला कळायला हवं. अभ्यास करताना वातावरण प्रसन्न आणि मन आनंदी हवं. घरात चांगला प्रकाश हवा. हवा खेळती हवी. पण तू तर चक्क दारे खिडक्या बंद करून अगदी अंधूक प्रकाशात बसली आहेस. अगं अशा वातावरणात अभ्यास होणार तरी कसा, तूच सांग? म्हणून सांगतो खेळायला चल माझ्यासोबत! खेळाने मन प्रसन्न होईल, आनंदी होईल मग बघ कशी जादू घडते ते!

आता पुस्तक बंद करून राधा पोपटाबरोबर खेळू लागली. पोपटाच्या करामती बघू लागली. त्याचं गाणं, त्याचं बोलणं ऐकून राधाच्या चेहऱ्यावर हसू फुटले. पोपटाने सोबत आणलेला लाल पेरू राधाने मोठ्या आवडीने खाल्ला. यात अर्धा तास कसा गेला हेच कळले नाही. आता राधाचा चेहरा आनंदाने भरून गेला होता. आनंदी राधाला टाटा करून पोपट उडून गेला. राधाने त्याला थांब थांब म्हटले पण तो न ऐकताच उडून गेला.

मग मोठ्या आनंदात राधाने गणिताचे पुस्तक उघडले आणि दोनच मिनिटात राधाची कळी खुलली. कारण तिला गणितं कशी करायची हे समजले होते. मग ती भरभर गणितं सोडवू लागली; अगदी आत्मविश्वासाने आणि आनंदाने! आता राधा विचार करू लागली. आज दिवसभर आपल्याला गणितं सुटत नव्हती. मग आता अशी काय जादू घडली! तेव्हा तिच्या लक्षात आले, की वातावरण आनंदी आणि प्रसन्न असेल, तर वाचलेलेही चटकन समजते. कोंदट वातावरणात निराशा मनाला घेरून टाकते. सहज, सोप्या गोष्टी अवघड वाटू लागतात." मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण" या श्लोकाचा अर्थ खऱ्या अर्थाने राधाला आज समजला होता.




## जळणारे जळोत!

**प्रतिभारंग**
**प्रा. प्रतिभा सराफ**



कॉलेजमधून साधारण पाच-साडेपाच वाजता घरी आले आणि दार उघडले. सासूबाईंच्या रूमचा दरवाजा बंद होता मात्र हॉलमध्ये धूर धूर पसरला होता. खोकत खोकतच स्वयंपाकघरापर्यंत पळतच गेले आणि गॅस बंद केला. दूध व्यवस्थित जळून भांडेसुद्धा जळले होते. भांडे तसेच्या तसे उचलले आणि एका कागदी पिशवीच्या आत टाकून त्या कागदी पिशवीच्या वरच्या टोकाला रबरब्रॅन्ड लावला आणि ते घराबाहेर नेऊन जिन्याच्या कोपऱ्यात ठेवले. एक्झॉस्ट फॅन लावला. हॉलच्या खिडक्या उघडल्या आणि पंखे सुरू केले. साडी बदलून यावे म्हणून जरा बेडरूममध्ये गेले. बाहेर आले तर सासूबाईंचा आवाज,

"अगं बाई, काय जाळलंस?"

मी म्हटले, "हो मी आत्ताच घरात शिरले. तुम्ही दुधाचं पातेलं गॅसवर ठेवलं होतं. ते जळलं."

"नाही मी तर गॅस बंद करून गेले होते."

मी म्हटले, "तुम्हाला वाटलं तुम्ही बंद केलात पण तो चालूच राहिला..."

"अरे बापरे म्हणजे दुपारी तीनपासून गॅस चालूच होता तर?... बरं ते पातेलं मला दिसत नाही कुठे..."

"पातेलं फारच जास्त जळलंय. जिन्याकडे ठेवून आले."

"का गं?"

मी म्हटले, "ते घासायच्याही फार पलीकडं गेलंय." त्यांना काही फार त्याच्यावर विश्वास वाटला नाही. त्या बाहेर गेल्या. त्यांनी पिशवी उघडून पातेले पाहिले. चक्क त्याला घरात घेऊन आल्या. मला म्हणाल्या, "मी घासून साफ करते."

मी म्हटले, "उगाच त्रास करून घेऊ नका. ते घासायच्या पलीकडं गेलंय."

तरीही त्यांनी थोडाफार प्रयत्न केलाच आणि त्यांच्याही लक्षात आले की हे घासायच्या पलीकडे गेले आहे. परत त्याच पिशवीत टाकून त्यांनी बाहेर नेऊन ठेवले.

मी काही माझ्या सासूची तक्रार करण्यासाठी हा लेख लिहीत नाही; परंतु अनेकदा कोणाचातरी फोन येतो आणि चहाचा कप घेऊन मी बेडरूममध्ये येते आणि तिथेच तासभर गप्पा मारत बसते. मला बेडरूमच्या खिडकीतून दूध जळण्याचा वास येतो तेव्हा मी मनात म्हणते - काय माणसं आहेत... दूध ठेवतात आणि कुठे जातात कोणास ठाऊक!

माझ्या गप्पा रंगात आलेल्या असतात आणि मग रंगलेल्या गप्पांमध्ये आलेले विषय आणखी कोणाला तरी सांगितल्याशिवाय कसे समाधान मिळणार? मग आणखी एक-दोन फोन झाल्यावर दोन तासानंतर मी बेडरूममधून बाहेर पडते आणि मला घरात धूर दिसू लागतो. असे अधूनमधून माझ्याही बाबतीत घडत असतेच! कधी पातेले थोडेसे तर कधी खूप जास्त जळते.



परंतु एक माझा अनुभव असा आहे की जेव्हा जेव्हा आमच्या घरात दूध जळते ना तेव्हा मला कधीच वाटत नाही आमच्या घरात जळतेय म्हणून! उलट कोणाच्यातरी घरातून वास आल्यासारखे वाटून मी ढिम्म बसून राहते. हे प्रत्येकाच्या घरात घडत राहते.

दोन दिवसांपूर्वी सोसायटीच्या आत एक विक्रेता खूप साऱ्या कॉपर बॉटम भांड्यांचा स्टॉल लावून बसला होता. चकचकीत स्टीलची आणि खालून तो तांब्याचा लालसर रंग पाहून मी त्या भांड्यांकडे आकर्षित झाले तेव्हा तो विक्रेता म्हणाला की या भांड्यांवर पंचवीस टक्के डिस्काउंट आहे; परंतु तुम्हाला त्या बदल्यात घरातील कोणतेही एक भांडे द्यावे लागेल. मी बाहेरून सोसायटीच्या आत शिरले होते. मला घरी जाऊन भांडे शोधणे कठीणच वाटत होते शिवाय आमच्या घरात अशी देण्यायोग्य कोणते भांडे आहे ते माझ्या लक्षात येत नव्हते. मी त्यांना म्हटले, "आम्ही अशी भांडी ठेवतच नाही."

बोलता बोलता माझे लक्ष उजवीकडे ठेवलेल्या भांड्यांच्या ढिगाकडे गेले. तिथे लोकांनी आपापल्या घरातील जुने फ्राईंग पॅन, तवे, कढया, कुकर असे काही काही ठेवलेले होते. सर्वात वर जो फ्राईंग पॅन होता त्याच्यावर एक पोळी जळलेली होती. ती इतकी जास्त जळलेली होती की ती त्या फ्राईंग पॅनवरून काढणे सुद्धा शक्य नव्हते. त्या पोळीकडे पाहून मला हसू आले. खरंतर मी त्याचा फोटो काढून ठेवायला हवा होता, असे नंतर वाटून गेले. पण पोळी इतकी जळावी म्हणजे बाई पोळी ठेवून दिवसभरासाठी घराबाहेर गेली होती की काय असे वाटून गेले. एकीकडे ही खराब झालेली भांडी आणि त्यातही जळलेली भांडी पाहून बरेही वाटले की लोकांच्याही घरात आपल्या घरातल्या सारखीच भांडी जळतात!

कुठेतरी युट्युबवर काहीतरी पाहताना पंचवीस हजार मिलियन लोकांनी पाहिलेला एक व्हिडीओ समोर आला ज्याचे शीर्षक होतेः जळलेली भांडी कशी स्वच्छ करावी?

हे शीर्षकच इतके आकर्षक होते आणि कधीतरी आपल्याला याचा नक्की उपयोग होईल म्हणून मी तो संपूर्ण व्हिडीओ पाहिला.

त्यानंतर घरातला डोशाचा तवा जो कडेकडेने जळलेला असतोच तो त्या व्हिडीओमध्ये दाखवलेले पदार्थ वापरून साफ करण्याचा प्रयत्न केला पण ते जळके कोपरे जराही निघाले नाहीत उलट माझे दोन्ही हात खरखरीत आणि सोलल्यासारखे झाले.

मग उगाचच जळण्याविषयीच्या मराठी म्हणी पाहत बसले. त्यात 'कोरड्याबरोबर ओले जळते' ही म्हण दिसली आणि खराब झालेल्या (हातांचा काही दोष नसताना) माझ्या हातांना एलोवेरा जेल लावत बसले. अगदी स्वयंपाक करताना हात जळला, तर बर्नोल लावून तो ठीक होऊ शकतो. 'जले की जख्म का खास इलाज बर्नोल.' ही लहानपणी खूपच प्रसिद्ध झालेली जाहिरात आठवली.

भांडी जळली तर घासून बघावीत नाही, तर फेकून द्यावीत. त्या निमित्ताने घरात नवीन भांडीतरी येतात! पण माणसे जेव्हा स्वतःची योग्यता नसताना, कुणाला त्याच्या योग्यतेनुसार काही मिळाले, तर उगाचच जळतात त्यावर बर्नोलचा उपयोग करता येता नाही, हे कोण कोणाला सांगणार बरे? त्यामुळे जळणारे जळोत पण आपण मात्र तवा-पातेले-कढयासहित कोणताही पदार्थ जळण्याच्या निमित्ताने आपल्या घरात नवीन भांडी आणत राहोत!

pratibha.saraph@ gmail.com



## संयम

**लहानशा गोष्टी, मोठा अर्थ**
**शिल्पा अष्टमकर**



एखादी गोष्ट आपल्या मनाविरुद्ध घडली की, आपल्याला चटकन राग येतो. राग थोडा वेळ धुमसतो आणि मग एकदम उसळी मारतो. मग ओरडणं, आरडाओरड, पुटपुटणं, पाय आपटणं, वस्तूंची फेकाफेक सुरू होते. काही वेळा समोर कोण आहे, आपल्यापेक्षा समोरची व्यक्ती लहान की मोठी याचेही भान राहत नाही. मग जिभेवरचा, मनावरचा, शरीरावरचा आपला संयम सुटतो.

तुम्ही म्हणाल, संयम म्हणजे नेमकं काय? संयम म्हणजे ताबा. घोड्याला लगाम नसेल, हत्तीला अंकुश नसेल, तर घोड्याचा वेग आणि हत्तीचा मद अनावर होईल. संयम म्हणजे ताबा असणे, आवर घालणे, बंधनात ठेवणे, अंकुश ठेवणे. संयम म्हणजे एक प्रकारची मर्यादा पाळणे, पथ्य पाळणे. जिभेवर संयम ठेवला नाही तर नको ते बरळत सुटल्याने आपले नुकसान होते. एखादा माणूस बरळत सुटला की आपण म्हणतो, "जरा जिभेला आवर, सैल सोडू नकोस. जिभेला लगाम घाल. वेळ आली की मार तुला खावा लागेल, जीभ आत लपून बसेल"

खाण्यावर संयम नसला तर नसती आफत ! आजाराला, रोगाला जणू आमंत्रण. लागलं चांगलं की फार खाऊ नये, संयम नसला तर आजाराला, रोगाला आपण आमंत्रण देतो. पोटदुखी, अपचन, गॅसचा त्रास होणे इत्यादी तक्रारी सुरू होतात.

चैन करतानाही संयमाची काळजी घ्यायला हवी. कुठे थांबायचे हे आपल्याला कळायला हवे. काही मुलांना सवय असते की एकदा एक गोष्ट करायची ठरवली की विचार न करता तीच गोष्ट एकसारखी करत राहायचे. दिवसभर सिनेमाची गाणी ऐकत बसणे, सारखे टीव्ही समोर बसणे दोन-दोन सिनेमे पाहणे, मित्रांबरोबर चकाट्या पिटत राहणे किंवा सारखे खेळत राहणे! आई-बाबा बोलावतात, मोठी माणसे सांगतात, घड्याळाचे काटे पुढे सरकतात, ह्यांचे लक्षच नसते. दुसऱ्यांनी सांगून, शिकवूनही अशांना कळत नाही. संयम स्वतःचा हवा. आपली मर्यादा, सीमारेषा ज्यांनी त्यांनी ठरवायला हवी. संयम असेल तर स्वतःला आणि दुसऱ्यालाही त्रास कमी. संयमी माणूस वाईटापासून स्वतःला नेहमी दूर ठेवतो. त्याचे वागणे मर्यादेशील असते. इतरांनी आपल्याला नावे ठेवू नयेत असे वाटत असेल तर संयमाने वागायचे ठरवायला हवे. संयमाने वागाल तर धीराने तुमची वाटचाल होईल.

मानवाच्या जीवनात अनेक गुणांची आवश्यकता असते; परंतु त्यापैकी सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे संयम. संयम म्हणजे आपल्या मन, वाणी आणि कृती यांवर नियंत्रण ठेवणे. प्रत्येक परिस्थितीत शांत राहून योग्य निर्णय घेणे, हे संयमी व्यक्तीचे लक्षण आहे.

संयम हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. राग, मत्सर, द्वेष, लोभ या वाईट भावना मनात उफाळून येतात; पण जो व्यक्ती संयमी असतो, तो त्या भावनांना आळा घालू शकतो.

संयमाने वागणारा मनुष्य केवळ स्वतःच नव्हे तर इतरांचेही भले करतो. शिक्षक, विद्यार्थी, पालक, अधिकारी - प्रत्येक क्षेत्रात संयम हा यशाचा पाया आहे.

संयमामुळे मनाला शांती मिळते. विचारपूर्वक वागल्यामुळे चुका कमी होतात आणि नातेसंबंध टिकतात.

संयम हा आत्मबल वाढवतो, मनाला स्थैर्य देतो आणि जीवनाला सौंदर्य देतो.संयमी माणूस जीवनात कितीही अडचणी आल्या तरी हरत नाही; तो प्रत्येक परिस्थितीत प्रकाश शोधतो.

चला, आपणही संयम हा आपला जीवनमंत्र बनवूया.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# बिहार निवडणुकीनंतर भाजपला अध्यक्ष मिळणार

## राजनाथ सिंह यांनी केली घोषणा

**केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय जनता पक्षाला पुढचे राष्ट्रीय अध्यक्ष कधी मिळणार याबाबत महत्त्वाची माहिती दिली**

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय जनता पक्षाला पुढचे राष्ट्रीय अध्यक्ष कधी मिळणार याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. बिहार विधानसभा निवडणुका संपल्यानंतर पक्षाला नवीन अध्यक्ष मिळेल असे त्यांनी सांगितले आहे. याबरोबरच पक्षात कोणताही मतभेद नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही दिवसांपासून भाजपाच्या नवीन राष्ट्रीय अध्यक्षांच्या नावाबद्दल वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. यादरम्यान एका मुलाखतीत राजनाथ सिंह म्हणाले, "बिहार विधानसभा निवडणुकीनंतर तुम्हाला पुढील भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षाबद्दल ऐकायला मिळेल. आमच्या पक्षात कोणताही वाद नाही." यावेळी राजनाथ सिंह यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (RSS) भूमिका देखील स्पष्ट केली आणि पक्षाच्या राजकीय निर्णयांवर त्याचा प्रभाव असल्याच्या चर्चाही फाटाळून लावल्या.

### भाजपला मिळणार १२ वे अध्यक्ष

पुढील राष्ट्रीय अध्यक्ष हे भारतीय जनता पक्षाचे १२ वे अध्यक्ष असणार आहेत. जेपी नड्डा पहिल्यांना २०१९ मध्ये कार्यवाहक अध्यक्ष बनले आणि त्यानंतर २०२० मध्ये अधिकृतपणे त्यांची निवड करण्यात आली. नुकतेच नड्डा यांना केंद्रीय मंत्रिमंडळात आरोग्य आणि रसायने तसेच खते मंत्री म्हणून स्थान देण्यात आले आहे. तेव्हापासून पक्षाकडून राष्ट्रीय अध्यक्षाचा शोध घेतला जात आहे. भाजप अध्यक्षपदासाठी नवे नेतृत्व ठरवण्याची प्रक्रिया सुरू असून अनेक वरिष्ठ नेत्यांची नावे चर्चेत आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान, मनोहर लाल खट्टर, भूपेंद्र यादव आणि धर्मेंद्र प्रधान ही प्रमुख नावे आघाडीवर आहेत. भाजप नेहमीच धक्कातंत्रासाठी ओळखला जात असल्याने या यादीत अजून एखादे नवीन आणि अनपेक्षित नाव जोडले जाऊ शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या पक्षाकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे पुढील काही दिवसांत भाजपच्या उच्चस्तरीय बैठकीनंतरच या राजकीय शर्यतीचा निकाल लागेल, अशी राजकीय वर्तुळातील चर्चा आहे.

# फिजिओथेरपिस्टना नावापुढे 'डॉक्टर' वापरता येणार नाही

## हायकोर्टाचा निर्णय

◆ केरळ (वृत्तसंस्था) :

आता फिजिओथेरपिस्ट आणि ऑक्युपेशनल थेरपिस्ट यांना त्यांच्या नावापुढे 'डॉक्टर' (Dr) हे पद वापरता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने महत्त्वाच्या आदेशानुसार दिला आहे.

केरळ उच्च न्यायालयाने ४ नोव्हेंबर रोजी हा अंतरिम (तात्पुरता) आदेश दिला आहे. या आदेशानुसार, इंडियन मेडिकल डिग्री ॲक्ट, १९१६ (Indian Medical Degrees Act, 1916) अंतर्गत वैद्यकीय पदवी असलेल्या व्यक्तीच फक्त 'डॉक्टर' हे शीर्षक वापरू शकतात. याचा उद्देश आरोग्य सेवेमध्ये पारदर्शकता राखणे आणि लोकांना व्यावसायिक पात्रतेबद्दल गैरसमज होऊ नये, हा आहे.

डॉक्टर संघटनांनी न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्यांच्या मते, हा निर्णय व्यावसायिक गोंधळ थांबवेल आणि रुग्णांचा विश्वास जपेल. इंडियन असोसिएशन ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशन आणि इंडियन मेडिकल असोसिएशन या दोन्ही संघटनांनी या निर्णयाचे समर्थन केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, यामुळे वैद्यकीय पेशाची प्रतिष्ठा कायम राहील आणि आरोग्यसेवा क्षेत्रातील विविध व्यावसायिकांची भूमिका स्पष्ट होईल.

इंडियन मेडिकल डिग्री ॲक्ट, १९१६ आणि नॅशनल कमिशन फॉर अलाइड अँड हेल्थकेअर प्रोफेशन्स यांच्या अभ्यासक्रमातील नियमांमध्ये विवाद आढळल्याने न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. एनसीएएचपीच्या अभ्यासक्रमात फिजिओथेरपिस्टना 'Dr' हे पद वापरण्याची परवानगी होती. यापूर्वी, डॉक्टरांच्या आक्षेपानंतर केरळच्या आरोग्य सेवा महासंचालकांनी (DGHS) फिजिओथेरपिस्टना 'Dr' पद वापरण्याची परवानगी देणारा त्यांचा जुना आदेश २४ तासांच्या आत मागे घेतला होता.



### पुढील सुनावणी कधी?

या प्रकरणाची पुढील सुनावणी १ डिसेंबर रोजी होणार आहे. तोपर्यंत, फिजिओथेरपिस्ट आणि ऑक्युपेशनल थेरपिस्ट यांना 'डॉक्टर' हे पद वापरण्यास बंदी राहणार असल्याचे देखील केरळ उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "आज, वंदे भारत, नमो भारत आणि अमृत भारत गाड्या भारतीय रेल्वेच्या पुढील पिढीचा पाया रचत आहेत. वंदे भारत ही भारतीयांची, भारतीयांनी आणि भारतीयांसाठी बांधलेली ट्रेन आहे आणि प्रत्येक भारतीयाला त्याचा अभिमान आहे. आज, विकसित भारतासाठी भारताने आपली संसाधने सुधारण्यासाठी मोहीम सुरू केली आहे, त्यामुळे या गाड्या त्यात एक मैलाचा दगड ठरणार आहेत."

# भारतीयांच्या सेवेत चार नवीन वंदे भारत ट्रेन; पंतप्रधान मोदींनी दाखवला हिरवा झेंडा

## एर्नाकुलम–बंगळूरु ट्रेन दक्षिण भारतातील केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटक राज्यांना जोडणार

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बनारस रेल्वे स्टेशनवरून चार नव्या वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. नव्या वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेन या वाराणसी-खजुराहो, लखनऊ-सहारापूर, फिरोजपूर-दिल्ली आणि एर्नाकुलम-बेंगळुरू या मार्गावरून धावणार आहेत. मोदींनी ध्वजारोहण करताच, स्थानकावरील प्रवाशांनी "हर हर महादेव" च्या जयघोषाने उत्सवाचे वातावरण निर्माण केले. या ट्रेनमुळे दक्षिण भारताला इंटर-स्टेट सेमी हाय-स्पीड प्रिमियम सेवा मिळणार आहे. ही ट्रेन केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटकाला जोडणार आहे. दक्षिणेतील या रेल्वेमुळे व्यापार, पर्यटन आणि शिक्षणाला चालना मिळणार आहे.

बनारस-खजुराहो वंदे भारत एक्स्प्रेस या मार्गावर थेट कनेक्टिव्हिटी प्रदान करेल आणि विद्यमान विशेष ट्रेनच्या तुलनेत अंदाजे दोन तास आणि ४० मिनिटे वाचवेल. ही ट्रेन वाराणसी, प्रयागराज आणि चित्रकूट सारख्या प्रमुख धार्मिक आणि सांस्कृतिक केंद्रांना जोडेल.

लखनऊ-सहारनपूर वंदे भारत एक्स्प्रेसमुळे लखनऊ, सीतापूर, शाहजहांपूर, बरेली, मुरादाबाद, बिजनौर आणि सहारनपूर येथील प्रवाशांना फायदा होईल. यामुळे रुरकी मार्गे हरिद्वारला प्रवास देखील सुलभ होईल. दरम्यान, फिरोजपूर-दिल्ली वंदे भारत एक्स्प्रेस ही तिच्या मार्गावरील सर्वात वेगवान ट्रेन असेल आणि दिल्ली आणि बठिंडा आणि पटियाला सारख्या पंजाबमधील प्रमुख शहरांमधील कनेक्टिव्हिटी मजबूत करेल. दक्षिण भारतात, एर्नाकुलम-बंगळूरु वंदे भारत एक्सप्रेस प्रवासाचा वेळ दोन तासांपेक्षा जास्त कमी करेल, ज्यामुळे प्रवाशांना जलद आणि अधिक आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल.

ट्रेनमध्ये जीपीएस आधारित इंफोटेनमेंट सिस्टम, बायो-वॅक्यूम टॉयलेट, ऑटोमॅटिक दरवाजे, एर्गोनोमिक सिटिंग, रिडिंग लाइट आणि वाय-फायची सुविधा उपलब्ध असणार आहे. देशभरात आतापर्यंत १६४ हून अधिक वंदे भारत ट्रेन सुरू झाल्या आहेत.

# डीएनएचे जनक आणि नोबेल पुरस्कार विजेते शास्त्रज्ञ जेम्स वॉट्सन यांचे निधन

## वयाच्या ९७ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

अमेरिकेचे नोबेल पुरस्कार विजेते आणि डीएनएचे जनक म्हणून ओळखले जाणारे शास्त्रज्ञ जेम्स वॉट्सन यांचे निधन झाले आहे. वयाच्या ९७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने विज्ञानातील संशोधन क्षेत्राला मोठा धक्का बसला आहे. वॉट्सन यांची २० व्या शतकातील सर्वात मोठ्या वैज्ञानिक संशोधकांपैकी एक अशी ख्याती होती.

१९५३ मध्ये जेम्स वॉट्सन आणि ब्रिटिश वैज्ञानिक फ्रांसिस क्रिक यांनी डीएनची डबल हेलिक्स संरचनेचा शोध लावला होता. या शोधामुळे जीवनाची मूलभूत रचना समजून घेणे मानवाला सोपे झाले. तसेच १९६२ मध्ये वॉट्सन, क्रिक आणि मॉरिस विल्किन्स यांना एका ऐतिहासिक शोधासाठी नोबेल पुरस्कार मिळाला होता.



वंश, लिंग या विषयांवर देखील त्यांनी अनेक वादग्रस्त टिप्पण्या केल्या होत्या. ज्यामुळे त्यांची प्रतिष्ठा धोक्यात आली होती. २००७ मध्ये एका टीव्ही प्रोग्राम दरम्यान त्यांनी आफ्रिकन लोकांच्या बुद्धिमतेवर वादग्रस्त विधान केले होते, यामुळे ते चांगलेच गोत्यात आले होते. न्यूयॉर्कमधील कोल्ड स्प्रिंग हार्बर लॅबचे चान्सलर पद त्यांना गमवावे लागले होते.

२०१९ मध्येही वादग्रस्त विधानामुळे हार्बर लॅबने त्यांच्या पदव्या, चान्सलर एमेरिट्स आणि प्रोफेसर एमेरिट्स मागे घेतल्या होता. लॅबने यावर स्पष्टीकरण देताना, वॉट्सन यांची विधाने चुकीची आहेत आणि विज्ञान याचे समर्थन करत नाही. वॉट्सन यांनी २०१४ मध्ये त्यांचे नोबेल गोल्ड मेडल लिलावात विकले. ते त्यांच्या विवादीत विधानांमुळे वैज्ञानिक समुदायांपासून वेगळे पडले होते. यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला होता.

वॉट्सन यांचा जन्म शिकागोमध्ये १९२८ साली झाला. त्यांनी लहान वयातच विद्यापीठात प्रवेश मिळाला होता. त्यांनी कैम्ब्रिज विद्यापाठीत डीएनएच्या संरचनेवर संशोधन केले. यावेळी त्यांची भेट फ्रांसिस क्रिक यांच्याशी झाला. क्रिक यांच्या नेतृत्त्वाखालीच त्यांनी कोल्ड स्प्रिंग हार्बर लॅबचे प्रमुख वैज्ञानिक संशोधन केंद्र बनले. वॉट्सन त्यांच्या वंश, लिंगा यांवरील विधानांमुळे एक वादग्रस्त व्यक्तिमत्त्व ठरले; परंतु त्यांनी लावलेल्या डीएनए संरचनेच्या शोधामुळेच मानवी जीवन आणि जीवशास्त्रावर ठसा उमटला.

# मधुमेह आणि हृदयरोग यांसारखे आजार असलेल्यांना अमेरिकेत स्थलांतर करता येणार नाही

◆ अमेरिका (वृत्तसंस्था) :

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्यापासून अनेक आश्चर्यचकित करणारे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमध्ये आता आणखी एका महत्त्वाच्या निर्णयाचा समावेश झाला आहे. ट्रम्प प्रशासनाने जाहीर केलेल्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, अमेरिकेत स्थलांतरित होऊ इच्छिणाऱ्या परदेशी नागरिकांना आता मधुमेह आणि हृदयरोग यासारख्या पूर्वीपासून असलेल्या दीर्घकालीन आजारांमुळे व्हिसा आणि ग्रीन कार्ड नाकारले जाऊ शकते. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने



ही मार्गदर्शक तत्त्वे जगभरातील अमेरिकन दूतावास आणि कॉन्सुलर कार्यालयांना पाठवली आहेत.

कोणते आजार असल्यास मिळणार नाही व्हीसा?

परराष्ट्र विभागाने व्हिसा अधिकाऱ्यांना पाठवलेल्या एका पत्रात अशा अर्जदारांची माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत, ज्यांच्या आजारपणावरील उपचारांसाठी लाखो डॉलर्सचा खर्च होऊ शकतो. नमूद केलेल्या आजारांच्या यादीमध्ये हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजार, श्वसन आजार, कर्करोग, मधुमेह, चयापचय आजार, न्यूरोलॉजिकल आजार आणि मानसिक आजार यांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अधिकाऱ्यांना विशेषतः लठ्ठपणासारख्या परिस्थितींचा विचार करण्याचा सल्ला देण्यात आला आहे, कारण लठ्ठपणामुळे दमा, स्लीप एपनिया आणि उच्च रक्तदाब यासारखे आजार होऊ शकतात, ज्याच्या उपचारासाठी मोठा खर्च येतो. या सर्व दीर्घकालीन आजारांचे मूल्यांकन आता संभाव्य संकेत म्हणून केले जात आहे की, एखादी व्यक्ती भविष्यात अमेरिकेवर आर्थिक भार बनू शकते का.

हे निर्देश पर्यटक आणि विद्यार्थी व्हिसासाठी लागू आहेत की नाही, हे सध्या स्पष्ट झाले नाही. तांत्रिकदृष्ट्या हे निर्देश सर्व व्हिसा अर्जदारांना लागू होतात, ज्यामध्ये पर्यटन आणि विद्यार्थी व्हिसासाठी अर्ज करणाऱ्यांचाही समावेश आहे. परंतु हे निर्देश प्रामुख्याने अमेरिकेत कायमचे वास्तव्य करू इच्छिणाऱ्यांसाठी लागू होणे अपेक्षित आहे.

## डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाचे महत्त्वाचे पाऊल

### आर्थिक परिस्थिती ठरणार महत्त्वाची

नव्या निर्देशांतर्गत व्हिसा अधिकाऱ्यांना स्पष्टपणे निर्देश दिले आहेत की, त्यांनी अर्जदारांकडे सरकारी मदतीशिवाय त्यांच्या संपूर्ण अपेक्षित आयुष्यभर अशा दीर्घकालीन वैद्यकीय सेवेचा खर्च भागवण्यासाठी आर्थिक संसाधने आहेत का, याची चौकशी करावी. इमिग्रेशन तज्ज्ञांचा असा युक्तिवाद आहे की, या धोरणामुळे वृद्ध अर्जदार आणि सामान्य दीर्घकालीन आजार असलेल्यांचे कायदेशीर स्थलांतर मोठ्या प्रमाणात कमी होईल, तर हे धोरण श्रीमंत आणि निरोगी अर्जदारांसाठी अनुकूल ठरेल.

# तुर्कीच्या परफ्यूम कारखान्यात भीषण आग

◆ इस्तंबूल (वृत्तसंस्था) :

तुर्कीच्या वायव्येकडील भागात एका परफ्यूम कारखान्याला भीषण आग लागली. या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला असल्याचे वृत्त समोर आले आहे, तर एकजण गंभीर जखमी आहे. घटनेची माहिती मिळताच तुर्कीच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. तसेच आसपासचा परिसर खाली करण्याचे आदेशही देण्यात आले आहे. मीडिया रिपोर्टनुसार, तुर्कीच्या कोकाली प्रांतात ही घटना घडली आहे. एका कारखान्याला अचानक आग लागली आणि मोठा स्फोट झाला असल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले. या आगीत सहा जणांचा मृत्यू झाला असून त्यांची ओळख पटवण्याचे कार्य सुरू आहे. सध्या आगीचे कारण अस्पष्ट आहे.

# चीनची तिसरी विमानवाहू युद्धनौका 'फुजियान' नौदलात सामील

## हिंद महासागरापासून तैवानपर्यंत चीनचे वर्चस्व वाढेल



◆ बीजिंग (वृत्तसंस्था) :

चीनने अधिकृतपणे त्यांची नवीनतम आणि सर्वात आधुनिक विमानवाहू युद्धनौका फुजियान त्यांच्या नौदलात दाखल केली आहे, अशी घोषणा सरकारी शिन्हुआ वृत्तसंस्थेने केली. ५ नोव्हेंबर रोजी हैनान प्रांतात झालेल्या एका समारंभात राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी फुजियान नौदलाकडे सोपवले. त्यांनी जहाजाला भेट देऊन तपासणीही केली.

फुजियान हे चीनचे तिसरे विमानवाहू जहाज आहे. हे जहाज पूर्णपणे चीनमध्ये डिझाइन आणि बांधले गेले होते. मागील दोन विमानवाहू जहाजे लिओनिंग आणि शेडोंग रशियन डिझाइननुसार बांधली गेली होती. फुजियान हे प्रगत विद्युत प्रणाली असलेले एक अतिआधुनिक वाहक आहे आणि ते J-३५ स्टेल्थ लढाऊ विमाने देखील तैनात करेल, ज्यामुळे तैवानपासून हिंदी महासागरापर्यंत चीनचा प्रभाव वाढेल. चीनने या जहाजावरून त्यांच्या नवीन J-३५ स्टेल्थ फायटरची चाचणी उड्डाणे केली आहेत. हे चीनचे पहिले स्टेल्थ विमान उडवण्यास सक्षम वाहक आहे. यामुळे लढाऊ विमाने जलद उड्डाण करतील. त्याचे सर्वात वेगळे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे फ्लॅट फ्लाइट डेक आणि इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटापल्ट सिस्टम (EMALS) आहे, ज्यामुळे लढाऊ विमाने सहज आणि जलद उड्डाण करू शकतात.

अमेरिकेशिवाय, फक्त चीनकडेच हे तंत्रज्ञान आहे. पूर्वीच्या चिनी जहाजांमध्ये स्की-जंप रॅम्प होते, ज्यामुळे जड विमाने उडवणे कठीण होते. तथापि, फुजियानवर जड लढाऊ विमाने, स्टेल्थ लढाऊ विमाने आणि अगदी रडारने सुसज्ज विमाने देखील सहजतेने उड्डाण आणि उतरू शकतात.

# पाक-अफगाण संघर्ष पुन्हा सुरू होणार

## इस्तंबूलमधील शांतता चर्चा अयशस्वी

◆ इस्लामाबाद (वृत्तसंस्था) :

पाकिस्तान आणि अफगाणिस्तामध्ये सीमावादावर पुन्हा संघर्ष होण्याची भीती निर्माण झाली आहे. दोन्ही देशांत तुर्कीची राजधानी इस्तंबूलमध्ये शांतता चर्चा पार पडली. पण या चर्चेत कोणताही तोडगा निघालेला नाही. यामुळे आता पुन्हा युद्ध भडकणार असे म्हटले जात आहे. ही दोन्ही देशातील तिसरी फेरी होती.

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये गेल्या महिन्यात संघर्ष सुरू झाला होता. यावेळी तुर्कीने मध्यस्थी करून दोन्ही देशांत तात्पुरती युद्धबंदी लागू केली होती. यादरम्यान दोन्ही देशांनी एकमेकांवर हल्ले देखील केले. दरम्यान नुकतीच दोन्ही देशांतील तिसरी बैठक पार पडली. पण ही बैठक अपयशी ठरली आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री आसिफ ख्वाजा यांनी युद्धाचा इशारा आधीच दिली होता. त्यांनी म्हटले होते की, तालिबानसोबतची बैठक निष्फळ ठरली, तर युद्ध होईल. त्यांच्या या विधानाने मोठी खळबळ उडाली होती. दरम्यान नुकत्याच झालेल्या चर्चेत कोणताही तोडगा न निघाल्याने आता तीव्र युद्ध पेटणार असे म्हटले जात आहे. शिवाय पाकिस्तानने इशारा दिला आहे.

सध्या पाकिस्तानने पुढील चर्चेचासाठी सहमती दर्शवलेली नाही. आसिफ ख्वाजा यांनी पाकिस्तानचा चौथ्यांदा अशी निष्फळ चर्चा करण्याचा कोणताही हेतू नसल्याचे म्हटले आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय तणावावर पुन्हा एकदा चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# 'मंटा रे' माशापासून अमेरिकेच्या पाणबुडीसाठी मिळाली प्रेरणा!

◆ वॉशिंग्टन (वृत्तसंस्था) :

'मंटा रे' हा एक विशालकाय समुद्री जीव आहे, जो दिसण्यात काहीसा अमेरिकेच्या स्टील्थ बॉम्बर बी-२ विमानासारखा दिसतो. हा मासा त्याच्या मोठ्या त्रिकोणी पंखांसाठी ओळखला जातो. याला 'डेव्हिल रे' असेही म्हणतात. कारण त्याच्या डोक्यावर शिंगासारखे पंख असतात.

मंटाचा आकार माशांच्या प्रजातींमध्ये सर्वात मोठा असतो. याची कमाल लांबी ७ मीटर (२३ फूट) पेक्षा जास्त असू शकते. रीफ 'मंटा रे'च्या पंखांचा फैलाव सरासरी सुमारे ११ फूट असतो. तर, विशाल महासागरीय 'मंटा रे'चा फैलाव २९ फुटांपर्यंत असू शकतो. हे मासे शांत स्वभावाचे असतात आणि सर्वसाधारणपणे त्यांच्यापासून मानवांना कोणताही धोका नसतो. 'मंटा'चे शरीर हिऱ्याच्या आकाराचे



असते आणि त्याला त्रिकोणी पंख असतात. त्याच्या तोंडासमोर शिंगासारखे पंख असतात, ज्यांना 'सेफेलिक लोब' म्हणतात. हे पंख खाद्य घेण्यासाठी पाणी तोंडात घेण्यास मदत करतात.

मंटा रे 'मोबुलिडे' कुटुंबातील 'मोबुला' प्रजातीशी संबंधित आहे. याच्या दोन मान्यताप्राप्त प्रजाती आहेत : रीफ रे आणि विशाल महासागरीय मंटा रे. मंटा आपले बहुतेक आयुष्य महासागराच्या खोलवर घालवतात. किनाऱ्याजवळ त्यांचे येणे दुर्मीळ असते. ते विशेषतः हिंद-प्रशांत महासागराच्या किनारी प्रदेशात आढळतात.

मानवी गतिविधी आणि हवामान बदलामुळे अनेक प्राण्यांचे अधिवास आक्रसत असताना, त्यांच्या संख्येत वाढ होणे हे शुभ संकेत मानले जाते, ज्यामुळे पर्यावरणशास्त्रज्ञ आणि सागरी शास्त्रज्ञांमध्ये एक नवी आशा निर्माण झाली. मंटा प्रजातीचे मासे अत्यंत बुद्धिमान आणि शांत स्वभावाचे असतात. ते भोजन आणि प्रजननासाठी एकत्र येतात, अन्यथा संपूर्ण आयुष्य एकाकी राहतात. वैज्ञानिक अभ्यासातून हे सिद्ध झाले आहे की, ते आत्म-ओळख करू शकतात. मंटा रे माशाच्या या विशिष्ट शारीरिक रचनेची कॉपी अमेरिकेने एका सागरी शस्त्रासारखी केली आहे. यूएस नेव्हीची नवी पाणबुडी 'मंटा रे' संरक्षण कंत्राटदार नॉर्थोप ग्रुमनने डिझाईन केली आहे.

अत्यंत गोपनीय ठेवण्यात आलेली ही विशाल पाणबुडी गेल्या वर्षी जून २०२४ मध्ये चुकून गुगल मॅपवर दिसली होती. 'मंटा रे'चा प्रोटोटाईप कॅलिफोर्नियातील पोर्ट ह्यूनेमी नौदल तळावर उपस्थित होता, नंतर तो एका सामान्य जहाजाने बदलण्यात आला. त्यानंतर, इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये सुरक्षा त्रुटीबद्दल चर्चा रंगली होती. 'मंटा रे'ने या वर्षाच्या सुरुवातीला पहिली सागरी चाचणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे आणि त्यानंतर तिच्या अनेक चाचण्या घेतल्या जात आहेत.

# जोधपूरच्या आयआयएचटी हातमाग क्षेत्रातील यशस्वी प्रगती

◆ सीमा पवार

**जोधपूर (राजस्थान):** फॅशन उद्योग वेगाने वाढत असताना, भारतातील हातमाग क्षेत्रातील तरुण विणकरांना प्रशिक्षण देताना समोर येणाऱ्या अनेक आव्हानांना सामोरे जाण्यास आयआयएचटी हे विद्यापीठ सज्ज आहे. जोधपूरस्थित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ हँडलूम टेक्नॉलॉजी (आयआयएचटी) ने अनेक आव्हाने असूनही, जुन्या हातमाग उद्योगाला नामशेष होऊ नये यासाठी पावले उचलली आहेत.

आयआयएचटी जोधपूरचे संचालक डॉ. शिवज्ञानम के. जे. यांनी पत्रकारांना सांगितले की, भारतात फॅशन उद्योग वेगाने वाढत आहे आणि हातमाग क्षेत्राला या शर्यतीत आपले स्थान टिकवून ठेवण्याची आवश्यकता आहे. ते म्हणाले की, पिढ्यानपिढ्या चालत आलेले हातमाग क्षेत्र आयआयएचटी सारख्या संस्थांमुळे उभे आहे.

आयआयएचटी जोधपूरने स्थापनेपासून आतापर्यंत १,०६२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे, जे आता वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहे. अनेकांनी स्वतःचे व्यवसाय सुरु केले आहेत. पंजाब, राजस्थान, हिमाचल प्रदेश आणि मध्य प्रदेशसारख्या ठिकाणी कापड आणि संबंधित उद्योगांमध्ये विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळत आहेत. त्यांनी सांगितले की संस्थेचे मुख्य उद्दिष्ट विणकर कुटुंबांच्या पुढील पिढीला या व्यवसायात पुढे नेणे आहे, याची खात्री करणे आहे.

संचालकांनी सांगितले की



संस्थेने २० टक्के प्रवेश राखीव ठेवले आहेत. जोधपूर शहरापासून १० किमी अंतरावर असलेल्या आयआयएचटी कॅम्पसमध्ये वसतिगृहाची सुविधा आहे. डॉ. शिवज्ञानम म्हणाले की, भारतात २८ लाखांहून अधिक विणकर आहेत; परंतु या क्षेत्रापर्यंत पोहोचणे हे सर्वात मोठे आव्हान आहे, कारण त्यापैकी हे क्षेत्र ८५ टक्के ग्रामीण भागात आहेत. त्यांनी सांगितले की आयआयएचटीमध्ये दिले जाणारे अभ्यासक्रम त्यांना विणकामाचे प्रशिक्षण देतातच, शिवाय बाजारपेठेतील संबंध समजून घेण्यास देखील मदत करतात.

डॉ. शिवज्ञानम म्हणाले की, फॅशन उद्योगाचा एक भाग असलेल्या हातमाग क्षेत्राला डिझाइन आणि रंगाच्या बाबतीत भविष्यासाठी हे कितपत उपयुक्त असेल याचा विचार केला जातो.

"तुम्ही आता विणत असलेले हातमाग आजचे नाही, ते पुढील ६ महिन्यांचा ट्रेंड लक्षात घेऊन विणले पाहिजे," असे त्यांचे मत आहे.

या विद्यापीठात अधिकाधिक सुती कापडावर भर दिला जातो. नैसर्गिक रंग जसे की हळद मसाला मेहंदी डाळींब बीट यांपासून तयार करण्यात आलेल्या रंगांचा वापर केला जातो.

# जर्मनीतील वुर्सेलेन येथे नर्सने १० रुग्णांना संपवले

## आणखी २७ जणांना मारण्याच्या तयारीत

## न्यायालयाने सुनावली जन्मठेपेची शिक्षा

◆ जर्मनी (वृत्तसंस्था) :

जर्मनीत एक मन सुन्न करणारी आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. रुग्णांची सेवा करण्याचे व्रत घेतलेल्या एका पॅलिएटिव्ह केअर नर्सने चक्क आपले रात्रीचे काम कमी करण्यासाठी १० रुग्णांची हत्या केल्याचे उघड झाले आहे. ४४ वर्षीय या नर्सला न्यायालयाने १० रुग्णांच्या हत्येप्रकरणी आणि २७ जणांच्या हत्येच्या प्रयत्नाप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

कामाचा भार कमी करण्यासाठी नर्सने उचललं टोकाचं पाऊल

जर्मनीच्या वुर्सेलन शहरातील एका रुग्णालयात डिसेंबर २०२३ ते मे २०२४ या काळात ही भयानक घटना घडली. न्यायालयाच्या नोंदीनुसार, ४४ वर्षीय नर्सने तिच्या रात्रीच्या ड्युटीदरम्यान कामाचा भार कमी



करण्यासाठी ही क्रूरता दाखवली.

नर्सने मॉर्फिन आणि मिडाजोलमसारख्या औषधांची जास्त मात्रा गंभीररीत्या आजारी आणि वृद्ध रुग्णांना दिली. सरकारी वकिलांनी सांगितले की, जास्त काळजी घेण्याची गरज असलेल्या रुग्णांची रात्रभर सेवा करावी लागू नये, म्हणून तिने त्यांना मारले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही नर्स अशा रुग्णांवर चिडचिड करत असे ज्यांना जास्त काळजीची गरज होती. न्यायालयाने म्हटले की, तिचे गुन्हे अत्यंत क्रूरता आणि गुन्ह्याची खोली दर्शवतात, त्यामुळे तिला १५ वर्षांनंतरही सोडले जाणार नाही.?

ही आरोपी नर्स २०२० पासून रुग्णालयात कार्यरत होती आणि तिने २००७ मध्ये नर्सिंगचे प्रशिक्षण पूर्ण केले होते. तिच्या रात्रीच्या ड्युटीदरम्यान रुग्णांची अचानक तब्येत बिघडण्याच्या घटना वाढल्याचे डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले आणि त्यानंतर २०२४ मध्ये तिला अटक करण्यात आली.

सरकारी वकिलांनी सांगितले की, या नर्सने आणखी रुग्णांना नुकसान पोहोचवले आहे का, हे तपासण्यासाठी अनेक मृतदेह पुन्हा खणून काढले जात आहेत. नवीन पुरावे मिळाल्यास तिच्यावर आणखी खटले चालवले जाऊ शकतात.

राणे प्रकाशन प्रा. लि. के लिए मुद्रक, प्रकाशक **मनिष तुकाराम राणे** द्वारा राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९/११/२ तथा ११/३, वारजे फ्लायओव्हर के सामने, राष्ट्रीय महामार्ग वारजे नाका, पुणे -४११०५८ से मुद्रित, तथा प्रहार कार्यालय, सर्व्हे नं. १२९/११/२ तथा ११/३, वारजे फ्लायओव्हर के सामने, राष्ट्रीय महामार्ग वारजे नाका, पुणे -४११०५८ से प्रकाशित. दुरध्वनी : ०२५३-४०६३३९४. संपादकीय सल्लागार : **नारायण राणे**, संपादक : **पद्मभूषण देशपांडे*** (पीआरबी अधिनियम के अंतर्गत समाचारों के चयन के लिए उत्तरदायी.) © सर्वाधिकार सुरक्षित.

# बीडमध्ये कोणाचा-कोणाला ताळमेळ लागेना!

## नगराध्यक्ष पद राखीव,पण इच्छुकांची गर्दी व गटबाजीने राजकारण तापले



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:नगरपरिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच शहरातील राजकीय वातावरण अचानक तापले असून, नगराध्यक्षपदाची राखीव श्रेणी बदलताच सर्वच पक्षांत खळबळ उडाली आहे. यंदा नगराध्यक्ष पद पहिल्यांदाच मागासवर्गीय महिला राखीव घोषित झाल्याने इच्छुकांची लाट उसळली आहे. मात्र इच्छुकांपेक्षा त्यांच्या मागे असलेल्या नेत्यांच्या गटबाजीनेच वातावरण अधिक ढवळून निघाले आहे.राखीव श्रेणी बदलल्याने सर्व मोठ्या पक्षांमध्ये किमान चार-पाच महिला इच्छुकांची नावे जोरदार चर्चेत असून, प्रत्येक गट आपापला उमेदवार पुढे करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे. पद महिलांसाठी राखीव असले तरी खरी चुरस ही त्यांच्या पाठीशी असलेल्या गटांमध्येच असल्याचे चित्र दिसत आहे.

### पक्षांतील गटबाजी उघडकीस

काही पक्षांमध्ये दोन प्रमुख गटांमध्ये उमेदवारांच्या नावावरून थेट संघर्ष सुरु आहे. सोशल मीडिया, स्थानिक पातळीवरील बैठकांमध्ये आणि ङ्गशक्तिप्रदर्शनांफ्मध्ये हे वातावरण चांगलेच जाणवत आहे.बीडमधील निवडणूक ही केवळ महिला उमेदवारांची नाही; तर त्यांच्या मागील गटांची प्रतिष्ठा आहे. म्हणूनच प्रत्येक पक्षात टोकाची गटबाजी दिसते.

त्यामुळे काही पक्षात तर सरळ सरळ दोन-तीन तंबू तयार झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.एका पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर माहिती देताना सांगितले की, उमेदवार कोण हे महत्त्वाचे राहिलेच नाही. तिच्या पाठीमागचा गट किती आक्रमक आहे हेच निर्णायक ठरणार आहे. प्रत्येकजण आपला समर्थक उमेदवार पुढे करण्यासाठी झटतोय, त्यामुळे पक्षातच संघर्षाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांचे हे वक्तव्य सध्या पक्षांत तयार झालेल्या अंतर्गत तणावाचे संकेत देणारे ठरले आहे.उमेदवारी जाहीर व्हायची बाकी असतानाच काही गट आक्रमक हालचाली करत असून, परस्परविरोधी रणनीतीमुळे पक्षांत गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. कोण कोणाच्या बाजूला आहे आणि कोण कोणाविरोधात उभे राहणार याचा नेम नागरिकांनाही कळेनासा झाला आहे. शहरातील राजकारणात इतक्या लवकर एवढा उफाळा कधीच पाहायला मिळाला नव्हता, अशीही चर्चा सुरू आहे. नगराध्यक्षपदाच्या बदलामुळे बीडच्या राजकारणात नव्या समीकरणांची बांधणी वेगाने सुरू झाली असून, आगामी दिवसांत गटबाजी आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निवडणुकीची घोषणा झाल्यापासूनच वातावरण पुढील काही आठवड्यांत अधिकच पेट घेईल, असा अंदाज वर्तवला जात आहे.

# बैलचोरीचा खोटा बनाव फसला

## वडवणी पोलिसांत तक्रारदारावरच गुन्हा



पुण्यभूमी प्रतिनिधी

वडवणी:दीड लाखांच्या बैलचोरीची तक्रार करणारा तक्रारदारच प्रत्यक्षात आरोपी ठरल्याची घटना वडवणी पोलिसांनी उघडकीस आणली आहे.संपत निपटे आणि त्यांचे भाऊ, रा. पिंपरखेड यांनी १३ नोव्हेंबर रोजी त्यांची बैलजोडी चोरी गेल्याची तक्रार दिली होती. परंतु तपासादरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांना तक्रारीत संशय वाटू लागला. पोलिसांनी केलेल्या चौकशीत ही बैलजोडी श्रीकांत मगर, रा. भावठाणा यांच्या ताब्यात आढळली. त्यांनी ती बाबाराव डाके, रा. टकारवाडी यांच्याकडून विकत घेतल्याचे सांगितले.पोर्टीनंतर बाबाराव डाके यांनीही बैलजोडी तक्रारदार निपटे यांच्याकडूनच पैसे देऊन विकत घेतल्याची माहिती दिली. पुढील चौकशीत संपत निपटे यांनी खोटा बैलचोरीचा बनाव केल्याचे मान्य केले.याप्रकरणी निपटे बंधूंवर खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करण्याचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी बैलजोडी मूळ मालक श्रीकांत मगर यांना परत केली.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे व पथकाने केली.

# लहुजी साळववेंना अभिवादन



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:आद्य क्रांतीकारक वस्ताद लहुजी साळवे यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख यांनी अभिवादन करुन जयंती साजरी केली.शहरातील साठेनगर येथे आज सकाळी सशस्त्र क्रांतिकारकाची देशातील पहिली तालीम सुरू करून तरुणांना क्रांतीचे धडे शिकवणारे देशातील पहिले क्रांतिकारक आद्य क्रांतिवीर लहुजी राघोजी साळवे यांच्या २३१ व्या जयंती निमित्त साठे नगर परळी यांच्या वतीने अभिवादन सभेचं आयोजन केल होते.यावेळी माजी नगराध्यक्ष दिपक नाना देशमुख यांनी कार्यक्रमाला उपस्थीत राहून लहुजी साळवे यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.व जयंतीनिमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांच्यासह नितीन चव्हाण, व साठे नगर येथील असंख्य आद्य क्रांतीकारक लहुजी साळवे यांना मानणारे तरुण व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# पंडित जवाहरलाल नेहरु जयंती



पुण्यभूमीप्रतिनिधी

परळी:शहरातील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेच्या संचालिका तथा प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे, संचालिका छायाताई देशमुख, प्रा डॉ विना भांगे यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा प्रविण फुटके यांनी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशाच्या प्रगतीसाठी जे प्रयत्न केले त्याचे फळ आता आपल्याला दिसून येत आहे. त्यांनी ठरवलेल्या विकासाच्या ध्येय धोरणामुळे व त्यांच्या दुरदृष्टीमुळे आज देशाची आर्थिक प्रगती होताना दिसून येत आहे. त्यांचे योगदान कधीही न विसरण्यासारखे आहे. अध्यक्षीय समारोप प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार वैभवी स्वामी हिने केले. कार्यक्रमास वरिष्ठ विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ विवेकानंद कवडे, प्रा डॉ पाध्ये, प्रा डॉ विना पारेकरसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चोसाळा महावितरणचा भोंगळ कारभार

## विवेक कुचेकर:अधिकारयाच्या तोंडाला काळे फासणार



### जनतेच्या सहनशिलतेचा अंत

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:तालुक्यातील चौसाळा महावितरण कार्यालयातर्गत चौसाळा, हिंगणी(बु), हिंगणी (खुर्द), जेबापिंप्री,पालसिंगण, चांदेगाव, देवीबाभळगाव, अजनवती, घारगाव, माळेवाडी, रुईगव्हाण, पिंपळगाव, वाढवाणा, मानेवाडी, सुलतानपुर, कानडी, गोंलग्री, लोणीघाट, आदी गावातील रोहीत्र पेटया गेल्या अनेक वर्षापासुन उघडया असुन याकडे महावितरणचे सर्रासपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी केला आहे. अनेक रोहित्राच्या बोक्सची झाकणे तुटलेली आहेत, त्यातील बाहेर डोकावणारे वायरिंग, लांबणारया वायरी, कित्येक डीपीची झाकणेही उघडीच, काही डिपी तर विजेच्या खांबावरुन निखळुन खाली जमिनीलगतच आलेल्या आहे. विशेष म्हणजे शेतीसाठी वापर असणारया या रोहित्राच्या मेटेन्सचा म्हणजेच फ्युज, रोहित्रातील तेल, त्याचे झाकण आदीचा खर्च शेतकरी वर्गणी करून करत आहेत. तसेच अनेक गावातील लोंबकळणारया तारा ह्या जीवघेण्या ठरत आहेत. या ताराचे घर्षण होऊन अनेक ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत. किमान आता तरी जनतेच्या सहनशिलतेचा अंत न पाहता वरील सर्व बाबींची दखल घ्यावी अशी मागणी नागरिकांतुन होत असुन रोहित्राच्या उघडया असलेल्या पेटयामुळे यापुर्वीही अनेकाचे जीव गेलेले आहेत. आणखी किती जीव जाण्याची वाट महावितरण बघत आहे? महावितरण कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकार्यानी तात्काळ दखल घेऊन दुरुस्ती कामाला सुरुवात करावी अन्यथा महावितरणच्या अधिकारयाच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी दिला आहे.

# स्पर्धा परीक्षेतून मिळविले यश

## रामेवाडी येथे ग्रामस्थांनी केला सत्कार



पुण्यभूमी प्रतिनिधी

सिरसाळा:परळी तालुक्यातील सिरसाळा नजीक असलेल्या बोरखेड येथील चळवळतील चळवळतील कार्यकर्ते विक्रम मिसाळ यांचे चिरंजीव अविनाश मिसाळ यांनी राज्यसेवेच्या परिक्षेत यश मिळवले, या बद्दल त्यांचा रामेवाडी येथे ग्रामस्थांच्या वतिने सत्कार व सन्मान करण्यात आला . सत्कार समारंभाचे आयोजन सन्मानिय प्रभाकर तात्या पौळ यांनी केले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दिपक खोसे, बाळासाहेब नाटकर,नितीन निर्मळ, वैजनाथ मुठाळ,फारुक भाई कुरेशी ,पत्रकार मिलिंद चोपडे ,कैलास जाधव ,माजी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक बालासाहेब कदम , विक्रम मिसाळ उपस्थित होते. सत्काराला उत्तर देतांना आपल्या भाषणात एमपीएससी उत्तीर्ण अविनाश मिसाळ म्हणाले कि,प्रत्येकात वेगळी विशेषता असते , मुलाची योग्यता पाहून त्या क्षेत्रात करिअर करण्यात पालकांनी प्रोत्साहन द्यावे,मेहनत करत रहा ,यश नक्कीच मिळेल,दरिद्री दूर करण्याचे एकमेव माध्यम शिक्षण आहे.सामाजिक वेवस्थे मध्ये पिछाडलेल्या समाजाला महात्मा फुलेंनी प्रवाहात आणले,महापुरुषांच्या त्याग,बलिदान,समर्पणा मुळे आज आपण शिक्षण घेऊ मोठ्या हुद्द्यावर पोहचत आहोत असेही मिसाळ यांनी म्हटले आहे. दरम्यान नितीन निर्मळ , विक्रम मिसाळ,पत्रकार मिलिंद चोपडे यांचे देखील भाषण झाले. यावेळी प्रभाकर तात्या पौळ, वैजनाथराव पौळ , भद्रीभाऊ पौळ ,भारतराव पौळ जगन्नाथ अंबुरे, माणिक कुकडे सर, सुभाष अंबुरे ,दिनकर पौळ, प्रकाश आंबुरे ,सुभाष पौळ, रामेश्वर भाऊ पौळ ,मंचक आंबुरे दिनकर पौळ, कारभारी शिंदे सह सर्व रामेवाडी ग्रामस्थ व परिसरातील मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, राज्यसेवा आयोगाच्या परीक्षेत मिळविलेले यश तरुणांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी तिच्यावर मात करून यश संपादन करता येते, हे या यशाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

# काडीवडगाव शाळेत बालदिन



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत पंडित जवाहरलाल नेहरू जयंतीनिमित्त बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक रवींद्र वावळकर यांनी भूषविले. व्यासपीठावर श्री. बहिरवाळ सर, श्री. बडे सर, अंगणवाडी सेविका श्रीमती जयश्रीताई बादाडे, श्रीमती ललिता वावळकर, श्रीमती कांचन टिळे व श्रीमती जनाबाई मोहन राऊत उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात नेहरूंच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी नेहरूंचे बालप्रेम, शिक्षणाचे महत्त्व, स्वच्छता, पर्यावरण आणि मूल्य शिक्षण या विषयांवर प्रभावी विचार मांडले. काही विद्यार्थ्यांच्या प्रभावी व आत्मविश्वासपूर्ण वक्तृत्वाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.यानंतर श्री. बडे सर व श्री. बहिरवाळ सर यांनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय मार्गदर्शनात मुख्याध्यापक रवींद्र वावळकर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता व आत्मविश्वासच त्यांचे उज्ज्वल भवितव्य घडवतील, असे सांगत बालदिनाचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंजली हातागळे व कु. रुंजी बादाडे यांनी केले. कार्यक्रमासाठी शिक्षकवर्ग, कर्मचारी आणि ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

# बीड नगराध्यक्षपद महिलांचा हक्क

## प्रेमलताताई चांदणे यांचे परखड मत



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: नगरपरिषद नगराध्यक्ष पद हे अनुसूचित जाती महिला राखीव असताना, त्या पदावर पुरुषांनी अप्रत्यक्षपणे अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करणे ही महिला सक्षमीकरणाची थट्टा असल्याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत, बीड नगरपालिकेच्या माजी सभापती तथा नगराध्यक्ष पदाच्या संभाव्य उमेदवार सौ. प्रेमलताई आत्माराम चांदणे यांनी ठाम भूमिका व्यक्त केली आहे. प्रकाशित केलेल्या प्रसिद्धीपत्रकात त्या म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाने महिलांना समान नागरी हक्क आणि आरक्षणाचा अधिकार बहाल केला आहे. महिलांना आरक्षण नसते, तर पुरुष कधीही महिलांना सत्तेच्या जागांवर बसू दिले नसते. त्यामुळे राखीव असलेल्या नगराध्यक्ष पदावर पुरुषांनी ङ्गमहिलेच्या नावाखालीफ नियंत्रण ठेवणे पूर्णपणे अन्यायकारक आहे.त्यांनी स्पष्ट केले की महिला कोणतेही पद सक्षमपणे सांभाळू शकतात. निर्णयक्षमता, नेतृत्वगुण आणि जबाबदारी घेण्याची ताकद महिलांमध्ये कमी नाही; पण काहीजण महिला उमेदवारांना केवळ नावापुरती पुढे करून प्रत्यक्ष सत्ता स्वतःकडे ठेवण्याचा प्रयत्न करतात. ही मानसिकता बदलली पाहिजे. बीड नगराध्यक्ष पद हे अनुसूचित जाती महिला राखीव आहे, आणि त्या पदावर प्रत्यक्ष अधिकार महिलेलाच असला पाहिजे, असे परखड मत चांदणे यांनी व्यक्त केले.नगराध्यक्ष पदाचा निवडणूक माहौल तापत असताना, प्रेमलताताई चांदणे यांचे हे विधान मोठी चर्चा रंगवणारे ठरत आहे.

# परळीत २७ नानिर्देशनपत्र दाखल

## परळीत निवडणूक वातावरण तापले



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या नामनिर्देशन प्रक्रियेला वेग आला असून, शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर रोजी एकाच दिवशी २७ नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आली. यामध्ये नगराध्यक्ष पदासाठी ३ उमेदवार, तर नगरपरिषद सदस्य पदांसाठी २४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले.नगराध्यक्षपदासाठी शेख कौसरबेगम अश्फाक, महंमद फरजाना सुलेमान,शेख नूरजहाँ बेगम मैनोद्दीन या तीन महिला उमेदवारांचा समावेश आहे.प्रभाग दोनसाठी कुरेशी वहाब हमीद यांनी एक तर शेख जुबेर लालामिया यांनी दोन नामनिर्देशनपत्र दाखल केली. प्रभाग तीनसाठी शेख खैरुनिसा बेगम युसूफ, तांबोळी अजीम इसाक, शेख सोहेल मुख्तार, शेख हुसेनाबी अमीन आणि शेख आयेशा मोसीन यांनी उमेदवारी नोंदवली. प्रभाग सहासाठी आंधळे गोपाळकृष्ण रावसाहेब आणि पद्मराज बलभीम गुट्टे (सर्वसाधारण) यांनी अर्ज दाखल केले.प्रभाग सातसाठी देशमुख मंगेश शिवाजीराव (सर्वसाधारण) यांनी उमेदवारी अर्ज दाखल. प्रभाग नऊसाठी शेख नूरजहाबेगम मैनोद्दीन, सय्यद असिया बेगम युसूफ, शेख रेहाना बाबुमिया आणि नसरीन बेगम अर्शद खान यांनी उमेदवारी दाखल केली. प्रभाग दहासाठी सुरेखाबाई पंडित झिंजुर्डे यांनी दोन नामनिर्देशनपत्र दाखल.प्रभाग पंधरासाठी मुजावर शाहेद बाबामिया यांनी अर्ज दाखल.प्रभाग सहासाठी शेख अश्फाक सज्जाद, बागवाले नितीन माणिक आणि पठाण इमरोज फिरोज यांनी उमेदवारी दाखल केली. प्रभाग सतरासाठी क्षीरसागर सुवर्णमाला, पठाण रसूल खान अफसर खान आणि शेख निसार नसीर यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले. परळी नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारांची वाढती उत्सुकता पाहता यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची होणार असल्याचे दिसत आहे.

# जिल्हा कृती दलाची बैठक



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षते खाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती संभागृहात जिल्हा कृती दलाची बैठक संपन्न.या बैठकीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एफ. एम. शेख व परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव आणि चाइल्ड समन्वयक अश्विनी जगताप यांनी माहे एप्रिल २०२५ ते नोव्हेंबर २०२५ काळात थांबवलेले १५१ बालविवाहची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.बालकल्याण समिती अध्यक्ष अशोक तांगडे सदस्य संतोष वारे,सुरेश राजहंस यांनी त्याच्या कडील बालविवाहाच्या प्रकरणाचा आढावा प्रस्ताविकाव्दारे सादर केला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की ३ जानेवारी २०२६ रोजी संपूर्ण जिल्हयातील शाळेत स्त्री मुक्ती दिना निमित्त रॅलीचे आयोजन करून जास्तीत जास्त बालिकाचा सहभाग नोंदवणे व तसेच गट-शिक्षणाधिकारी सी.डी.पी.ओ यांच्या मार्फत बाल दिन, पथनाट्या, दवंडी, देणे अशा विविध कार्यक्रमाद्वारे बालविवाहाचे दुष्परिणाम या विषयावर कार्यक्रम आयोजित करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# संदीप भैय्यांकडून

प्रामाणिक म्हणून पाहिले जाते. सर्व समाजात त्यांचे नाव आदराने घेतले जाते. सर्व समाजात मिळून मिसळून राहणारे आणि सुखदुःखात धाऊन जाणारे सचिन आप्पा यांची ओळख आहे. त्यामुळे संदीप क्षीरसागर हे सचिन आप्पा सोनवणे यांनाच उमेदवारी देतील आणि बीड नगर पालिकेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचा झेंडा फडकवतील यात तिळमात्र शंका नाही.

# बीडमध्ये होणार लोककलेचा जल्लोष

## सांस्कृतिक : डॉ.दिपाताई क्षीरसागर यांचे आवाहन




पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:बालरंगभूमी परिषद, मुंबई आयोजित जल्लोष लोककलेचा-चला उधळूया लोकरंगफ या गायन, वादन व नृत्य महोत्सवाचे आयोजन बीड शाखेतर्फे शनिवारी (दि.१५) सकाळी १० वाजता केले आहे. हा उपक्रम सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला व विज्ञान महाविद्यालयाच्या परिसरात पार पडणार आहे. या महोत्सवातील पारितोषिक वितरण प्रसिध्द अभिनेत्री व बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा निलम शिर्के सामंत यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती बीडच्या बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी दिली आहे.गेल्या अनेक आठवड्यांपासून जिल्ह्यातील विविध शाळांकडून या स्पर्धेसाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. शाळांतर्गत बालकलावंतांनी समुह लोकनृत्य, समुह लोकगायन, वैयक्तिक लोकगायन व लोकवाद्य वादन या प्रकारांत सहभाग नोंदवला आहे. या महोत्सवात जवळपास साडेतीनशे बालकलावंत सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. तसेच इतर शाळांनीही आपल्या विद्यार्थ्यांना बालप्रेक्षक म्हणून उपस्थित ठेवावे, असे आवाहन बालरंगभूमी परिषद बीडच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. दिपा क्षीरसागर यांनी केले आहे. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा निलम शिर्के सामंत यांच्या पुढाकारातून पिढी घडवण्याचे कार्य परिषद अनेक वर्षांपासून करत आहे. या परंपरेला पुढे नेत गेल्या वर्षापासून लोककला महोत्सवाचे राज्यव्यापी आयोजन सुरू करण्यात आले आहे. हा महोत्सवाचा हेतू आहे. विद्यार्थ्यांना गायन, वादन, नृत्य या क्षेत्रात कला व कौशल्य विकसित करण्याची संधी मिळावी, यासाठी परिषद प्रयत्नशील आहे. समुह लोकनृत्य, समुह लोकगीत, वैयक्तिक लोकगीत, वैयक्तिक नृत्य आणि एकल लोकवाद्य वादन अशा प्रकारांत स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. प्रत्येक प्रकारात सर्वोत्कृष्ट, उत्कृष्ट, उत्तम आणि प्रशंसनीय अशी पारितोषिके दिली जाणार असून काही रोख पारितोषिकांचाही समावेश आहे. या महोत्सवास उपस्थित राहण्याचे आवाहन बीड बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा व परिषद उपाध्यक्षा प्राचार्य डॉ.दिपाताई क्षीरसागर, स्नेहल पाठक, विलास सोनवणे, डॉ. संजय पाटील देवळानकर, अनुराधा चिंचोलकर, प्रा.दिपक जमधाडे, मिलिंद शिवणीकर, नामदेव साळुंके, राहुल सोनवणे, दुष्यंता रामटेके, सुरेश साळुंके, अमित गाडे, दिपक गिरी, विश्वंभर देशमाने, डॉ. अनिता शिंदे, विजयकुमार राख, सिध्दार्थ अग्रवाल, अक्षय फुलझळके, सुमित गायकवाड, सुरेश थोरात, नितीन प्रधान, पवन शिंदे, बाबासाहेब कांबळे, रोहित पुराणिक आदींनी केले आहे.

# खबरदार गोंधळ घालाल तर...

## निवडणूक अनुषंगाने दिला दम

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:निवडणुक पार्श्वभूमीवर बीड शहर पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस सर्वसामान्य नागरिक, शांतता समिती सदस्य आणि निवडणूक उमेदवार उपस्थित होते. शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा आढावा घेवून निवडणूक काळातील अडचणींची माहिती पोलिस प्रशासनाने सहभागी नागरिकांसोबत सामायिक केली. बीड पोलिस अधिकारी पूजा पवार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की,शहरात संध्याकाळच्या गस्तीची शृंखला अधिक कडक स्वरूपात राबवण्यात येईल.निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्या किंवा गोंधळ घालणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. निवडणूक काळात जास्तीत जास्त पोलिस बंदोबस्त आणि मनुष्यबळ तैनात केले जाईल.नागरिकांनी संयम पाळून पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, कुणालाही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि निवडणूक पूर्णपणे शांततेत पार पाडावी, असे आवाहन या वेळी करण्यात आले.याचबरोबर पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी तक्रारी नोंदविण्यासाठी उपलब्ध केलेले ठ कोड, हेल्पलाईन नंबर, विविध डिजिटल प्लॅटफॉर्म याबद्दल नागरिकांना माहिती देण्यात आली. प्राप्त तक्रारींवर तातडीने कारवाई केली जाईल, असेही सांगण्यात आले.या कालावधीत सोशल मीडियावरही कडक लक्ष ठेवण्यात येणार आहे. भडकावू पोस्ट, अफवा किंवा नियमबाह्य सामग्री प्रसारित करणाऱ्यांविरुद्ध त्वरित गुन्हा दाखल करून अटक करण्यात येईल, असा इशाराही पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांच्या वतीने उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांनी दिला.